# उल्हासनगर महानगरपालिका

## (अंतर्गत) लेखा परिक्षण अहवाल

### सन २०१२ - २०१३

Scan with Fast Scan

# उल्हासनगर महानगरपालिका

अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल

## सन २०१२ - २०१३

Scan with Fast Scan

# उल्हासनगर महानगरपालिका
## लेखा परिक्षण अहवाल
## सन २०१२–२०१३

Scan with Fast Scan

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | विभागाचे नाव | आक्षेपांचे क्र. | पान नं. |
|---|---|---|---|
| ०१ | सार्वजनिक बांधकाम विभाग | ०१ ते २१ | १ ते ६२ |
| ०२ | पाणी पुरवठा विभाग | २२ ते २९ | ६३ ते ७९ |
| ०३ | नगर रचना विभाग | ३० ते ३१ | ८० ते ८४ |
| ०४ | वाहन विभाग | ३२ ते ३४ | ८५ ते ९१ |
| ०५ | क्रिडा विभाग | ३५ ते ३६ | ९२ ते ९५ |
| ०६ | भांडार विभाग क्रिडा | ३७ | ९६ |
| ०७ | समान्य प्रशासन विभाग | ३८ ते ३९ | ९७ ते ९९ |
| ०८ | मालमत्ता विभाग | ४० ते ४३ | १०० ते १०५ |
| ०९ | लेखा विभाग | ४४ | १०६ ते १०७ |
| १० | वैदयकिय आरोग्य विभाग | ४५ | १०८ ते १०९ |
| ११ | अतिक्रमण विभाग | ४६ | ११० ते १११ |
| १२ | विधी विभाग | ४७ | ११२ |


Scan with Fast Scan

# सन २०१२–२०१३ या वित्तीय वर्षाचा वार्षिक अहवाल

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण ९ चे कलम १०६(३) नुसार प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर नगरपालिका मुख्य लेखा परिक्षकाने महानगरपालिकेच्या मागील वर्षाच्या संपूर्ण लेख्यावरील आपला अहवाल स्थायी समितीस सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१२–२०१३ या वित्तीय वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल मा. स्थायी समितीपुढे ठेवण्यासाठी सादर करीत आहे.

## प्रस्तावना :–

उल्हासनगर महानगरपालिका २१/१०/१९९६ रोजी अस्तित्वात आली. त्यापूर्वी लेखा परिक्षण महाराष्ट्र शासनाचे संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे कडील मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा परिक्षण नवी, मुंबई या कार्यालयामार्फत केले जात होते. महानगरपालिकेच्या स्थापनेनंतर सदरचे लेखा परिक्षण महानगरपालिकेचे मुख्य लेखा परिक्षकामार्फत होत आहे. त्यानुसार जमा रकमांचे लेखापरिक्षण व खर्चाचे पूर्व लेखा परिक्षण केले जात आहे. पूर्व लेखा परिक्षणामुळे काम सुरू होण्यापूर्वीच अनियमितता निदर्शनास आल्यास त्यावर नियंत्रण ठेवता येते व पालिकेच्या निधीचा संभाव्य गैरवापर थांबवता येतो.

उल्हासनगर पालिकेमध्ये मुख्य लेखा परिक्षक, सहा. मुख्य लेखा परिक्षक , तसेच १ वरिष्ठ लेखा परिक्षक आणि ३ लिपीक असा कर्मचारी वर्ग देण्यात आला आहे. यामधील २ लिपीक हे सतत तहसीलदार यांचे कार्यालयात BLO चे काम (मतदार याद्यांचे पूर्नविलोकन करणे.) करित असतात. १ लिपीक संगणक ऑपरेटरचे काम करतात. व १ लिपीक आवक जावकचे काम करतात. यामुळे लेखा परिक्षणाचे काम प्रभावीपणे पणे करता आले नाही. सामान्य प्रशासनाकडे वेळोवेळी लेखी स्वरूपात अनुभवी कर्मचाऱ्याची नेमणूक करणेस कळवूनही पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात आलेला नाही. याबाबींचा परिणाम लेखा परिक्षणावर झालेला आहे. व यामुळे लेखापरिक्षण अहवाल विलंबाने सादर होत आहे.

प्राथमिक लेखा परिक्षणाच्या दृष्टीकोनातून, कार्यालयीन कामकाजामध्ये व लेख्यांमध्ये त्रुटी आढळतात त्या पुन्हा पुन्हा होऊ नये व कामामध्ये सुरळीतपणा, नियमितपणा तसेच मनपाच्या पैशाचा अपहार व गैरव्यवहार, गैरवापर टाळणे या उद्देशाने अंतर्गत लेखा परिक्षणात आढळून आलेल्या आक्षेपांचे बाबतीत संबंधीत विभाग प्रमुखांनी दखल घेऊन योग्य ती कार्यवाही त्वरीत करून अनुपालन सादर करणे आवश्यक आहे.

Scan with Fast Scan

परिशिष्ट क्र. (१) स्थानिक निधी लेखा कार्यालयाच्या प्रलंबित लेखा परिक्षण परिच्छेदांची आद्यावत माहिती

| आरंभिचे एकूण परिच्छेद | एकूण वगळण्यात आलेले परिच्छेद | शिल्लक परिच्छेद |
|---|---|---|
| ७१४ | ०० | ७१४ |

परिशिष्ट क्र. (२) केंद्र सरकारच्या महालेखा परिक्षक कार्यालयाच्या लेखापरिक्षण अहवालाबाबत.

महालेखापाल मुंबई यांचे कडून आपल्या महानगरपालिकेचे लेखा परिक्षण दर ३ वर्षानी होत आहे.

| वर्ष | आरंभिची शिल्लक २०११–१२ पर्यंत | महालेखा परिक्षक कार्यालयाने काढलेले परिच्छेदांची संख्या | निरिक्षण अहवालाची संख्या | अनुपालन मान्यते नंतर वगळण्यात आलेल्या परिच्छेदांची संख्या | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| २००३–०४ ते २०११–१२ | ८५ | ०० | ० | ०० | ८५ |

महालेखा पाल, मुंबई कार्यालयाच्या लेखापरिक्षण अहवालातील परिच्छेदांचे अनुपालन करण्याबाबत संबंधीत विभागांना कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार काही विभागांची अनुपालन सादर केलेले आहे. सदर अनुपालन महालेखापाल यांनी अद्याप मान्य केलेले नाही. त्यामुळे प्रलंबित आहेत.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

पारि.क्र.१

# सार्वजनिक बांधकाम विभाग

विषय:– उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सार्व.बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेल्या कामातील सर्वसाधारण अनियमितता

उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागातील कामांचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे सर्वसाधारण अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.

- उल्हासनगर क्र.३ हिराघाट ते मिनिस्टर कॉम्प्लेक्स ते समर्पन आपार्ट. पर्यंत रस्ता रूंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे.
- उल्हासनगर क्र.३ राधास्वामी सत्संग हॉल ते साईबाबा मंदिर पर्यंत रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे.
- उल्हासनगर १ ते ५ मधील मनपा चौक ते काटकेश्वर मंदिर व्हाया सी ब्लॉक चौक रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे
- उल्हासनगर क्र.५ दुधनाका ते गणेश नगरपर्यंत रस्ता रूंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण व नाला बांधणेचे काम करणे.
- उल्हासनगर ४ ओटी सेक्शन ते श्रीराम चौक पेट्रोल पंपपर्यंत रस्ता रूंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे.
- साईबाबा चौक ते मुरबाड रोड व्हाया धोबीघाट मंडळ रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे.
- वॅको जंक्शन ते माणेरा जंक्शन रस्त्याचे पुर्नपुष्ठांकन करणे.

• नेताजी चौक ते बॅरेक २०१८ व्हाया तहसिलदार ऑफीस रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे.

१) निविदा जाहीरात ज्या वर्तमानपत्रात देण्यात आली होती त्या वर्तमानपत्राची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध झाली नाही.

२) स्कोप ऑफ वर्क मधील २.२.२० व सर्वसाधारण सुचना क्र.३.१.२ नूसार महानगरपालिकेने प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. याबाबत अभिलेख नस्तीत जोडलेले नाहीत.

३) सर्वसाधारण अटी व शर्तीमधिल १.२ नुसार रस्त्याचे कामाचे पर्यवेक्षण शहर अभियंता व प्रोजेक्ट मॅनेंजमेंट सल्लागार यांनी करणे आवश्यक आहे. परंतू पर्यवेक्षणाचे अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाही.

४) सर्वसाधारण अटी व शर्तीमधिल १.३ व २.७ नुसार कामाच्या मोजमापाची नोंद उ.म.पा. चा प्रतिनिधी प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार यांनी कंत्राटदाराच्या उपस्थितीत मोजमाप पुस्तीकेवर नोंदविणे आवश्यक आहे. परंतू उपलब्ध झालेल्या मोजमाप नोंदवहीवर अश्याप्रकारे संयुक्तिकरित्या नोंदी झाल्या नसल्याचे निर्दशनास आले आहे.

५) सर्वसाधारण अटी व शर्तीमधिल २.४ नुसार कार्यादेशानंतर करण्यात येणाऱ्या कामाची प्रगतीसुची (प्रोग्रेस शेडयुल) शहर अभियंता यांना सादर करणे आवश्यक असतांना सदर अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही.

६) निविदेतील सर्वसाधारण अटी व शर्ती क्र. २.१० नुसार कामाकरिता वापरण्यात आलेल्या सर्व साहित्यांची मंजूरी कामात वापर करण्यापूर्वी शहर अभियंता, उ.म.पा, व उल्हासनगर मनपाने नेमणूक केलेले प्राजेक्ट मॅनेजमेंट

Scan with Fast Scan

सल्लागार यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे. अश्या मंजूरी अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

७) विशेष अटी व शर्तीमधिल क्र.१३ नुसार कंत्राटदाराने बिल सादर करतांना त्याने नोंदविलेल्या कामाचे मोजमापे साहित्याच्या चाचणी अहवालासह सादर करणे आवश्यक असतांना त्याचे पालन झाले नाही.

८) विशेष सुचनांमधील क्र.३ नुसार कंत्राटदाराने वापरलेल्या साहित्याचा व कामाचा चाचणी अहवाल शहर अभियंता व प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार यांचे स्वाक्षरीसह ठेवणे आवश्यक आहे. परंतू सदर अहवाल लेखापरिक्षणस अप्राप्त आहे.

९) नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण– २००८/१३३८/प्र.क्र. १७१/नवि २० दि. २/०३/२००९ अन्वये कामाचे त्रयस्त पार्टी कडून लेखापरिक्षण केल्याचे दिसून आले नाही.

१०) विशेष अटी व शर्ती क्र.६ नुसार कंत्राटदाराने साहित्यांचा चाचणी परिक्षण अहवाल नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध झालेली नाही.

११) तांत्रिक स्पेशिफिकेशन मधील १४.२.६ नुसार कंत्राटदाराने त्याच्या नियोजित कामाचा कार्यक्रम अहवाल महानगरपालिकेस सादर करणे आवश्यक आहे. त्याचे पालन झालेले नाही.

१२) काम सुरू करणेपुर्वी कामाच्या जागेवर घेण्यात आलेला स्थळ पाहणी अहवाल लेखापरिक्षणास अप्राप्त आहे. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहितामधील १२.८२ डी नुसार देयकासोबत वापरलेले डांबर, असलफाट सिमेंट, वाळु, खडी,

Scan with Fast Scan

स्टिल, काँक्रिट यांच्या खरेदी पावत्या व वाहतूक पास इ. देयकासोबत जोडणे आवश्यक आहे. परंतू त्याचे पालन झालेले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

# सार्वजनिक बांधकाम विभाग

परि. क्र. २.

अंदाजपत्रकतील रक्कम रू. ९,९९,३००

प्रशासकीय मान्यता:— नाही, तांत्रिक मान्यता:— शहर अभियंता क्र.२०५९

दि. ३/११/२००६

कायदिश क्र.१२३३ दि. २/०३/२००९, कामाची मुदत ०६ महिने

ठेकेदार:— शिवअमृत मजूर सहकारी संस्था

प्रमाणक क्र.३६८४ दि. २४/१२/२०१२ कामावरील खर्च रू. ९,९९,३००/—

**सदर निविदा नस्ती तपासले असता खालील त्रृटी निदर्शनास आल्या.**

१) नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. विघयो/१०२०००/१५९२/प्र.क्र. १८१/नवीन दि. ५/०३/२००२ मधिल नागरी दलीतवस्ती सुधारणाा योजनेच्या मार्गदर्शक तत्वे मधिल अ.क्र.७ (इ) नुसार प्रशासकिय मान्यता घेतल्या नंतर कामे सुरू करण्यात यावे. परंतू महानगरपालिकेने सदर काम दि. २/०३/२००९ पासून सुरू केले आहे. दलित वस्ती सुधार प्रस्ताव जिल्हाधिकारी ठाणे यांना दि. १८/११/२००८ रोजी पाठविल्याचे नस्तीत दिसते. मान्यतेच्या अधिन राहुन काम करण्यात आले आहे. शासन निर्णयाचे पालन झाले नाही.

२) २००८—०९ मध्ये सदर योजनेस रू. ७.४१ कोटी निधी जिल्हाधिकारी ठाणे, यांचेकडून धनादेशाव्दारे प्राप्त झाला आहे. असे असतांना सदर देयक सन १२—१३ मध्ये प्रदान करण्यात आले. एवढया विलंबाने खर्ची टाकण्याचा उद्देश दिसून आला नाही.

Scan with Fast Scan

३) कामाचा कालावधी दि. २/०३/२००९ ते १४/०५/२००९ असा आहे. परंतु विमा २१/०८/२००९ ते दि. २०/०२/२०१० या कालावधीचा काढलेला आहे. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन– १०१८/१३५७/प्र.क्र.१६६/९८/नवि–२८ दि. ३/११/२००३ अन्वये कामाचा व कंत्राटी कामगारांचा विमा उतरविणे बंधकारक आहे. त्याचे पालन झालेले नाही. अंदाजपत्रक रक्कम रू. ९९,३००/– च्या १टक्का रू.९९३० विम्याची रक्कम वसूल करण्यात यावी.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि.क्र.३

## सार्वजनिक बांधकाम विभाग

विषय:– उल्हासनगर १ ते ५ मधील मनपा चौक ते काटकेश्वर मंदिर व्हाया सी ब्लॉक चौक रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे कामातील अनियमितता

उल्हासनगर १ ते ५ मधील मनपा चौक ते काटकेश्वर मंदिर व्हाया सी ब्लॉक चौक रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे कामाच्या नस्तींचे लेखापरीक्षण केले असता उणिवा खालीलप्रमाणे निर्दशनास आलेल्या आहे.

कंत्राटदाराचे नाव :– मे. कोनार्क इन्फॉस्ट्रक्चर प्रा.लि.

तांत्रिक मान्यता क्र. व दि. ६२४४ दि. २७/०९/२०११

स्थायी समिती ठराव क्र.१०१ दि. १९/११/२०११

कार्यादेश क्र. व दिनांक– ३५०१ व दि २९/१२/२०११ (+७ टक्के)

कामाचा कालावधी– १५० दिवस मोजमाप नोंदवही क्र. २७८०

प्रथम धावते देयक प्रमाणक क्र. ३०३९ दि. ३/११/२०१२ रू.१७,८४,२१३/– चे ४ थे धावते देयक

१) कामाची मुदत १५० दिवस असतांना लेखापरिक्षण वर्ष अखेरपर्यंत काम पुर्ण झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे देण्यात आलेल्या मुदतवाढीबाबत स्थायी समितीची मंजूरीचे अभिलेख लेखापरीक्षणास अप्राप्त आहे.

२) वित्त विभाग शा.नि.विकास/१०९८/प्र.क्र.२९/९८/शासन हमी दि. १९.८. १९९८ नुसार विमा रक्कम रू. १९३९४/– देयकातून कपात करण्यात आलेली नाही.

३) अर्थ सॉईल मधील खोदाईतून १०१८.२१ घ.मी. माती निघाली असतांना खोदाईतून निघालेल्या १७७७.२१ घ.मी. ची वाहतूक केली आहे. जादा वाहतूक

Scan with Fast Scan

केलेल्या ७५९ घ. मी. ची. रू. ८२.४७/– प्रती घ. मी. प्रमाणे एकुण रू. ६२५९५/– इतक्या रकमेचे ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे.

४) प्रथम वेळी चार निविदाकारांच्या निवीदा प्राप्त झाल्या होत्या. चार मधील फक्त जयहिंद रोड बिल्डर्स वगळता इतर तिघांची निवीदा तांत्रिक कागदपत्रे अपुर्ण असल्यामुळे अपात्र झाल्याने निविदा प्रक्रियेस मुदतवाढ दिल असता मे. कोनार्क इन्फॉस्ट्रक्चर लि. व मे. जयहिंद रोड बिल्डर्स यांची निविदा प्राप्त झाली. कमीत कमी तिन निवीदा प्राप्त होणे आवश्यक असतांना शहर अभियंता यांनी कामाची निकड असल्याने निविदा उघडणेस शिफारस केली व मे. कोनार्क इन्फॉस्ट्रक्चर लि. यांची निविदा +७ टक्के दराने मान्य करण्यात आली.

५) मुळ अंदाजपत्रकानुसार सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू. १,८३,१४,४५०/– इतकी निश्चित असतांना खालील अतिरिक्त कामाकरीता अंदाजपत्रकात सुधारणा करून अंदाजपत्रकीय रक्कम रू. २,४८,३८,५००/– करण्यात आली आहे.

पाणी पुरवठा वाहिन्यांच्या खंदकांचे कामे रू. ५७,३४,९६६/–

महानगर गॅस वाहिन्यांचे खंदकांचे पुर्नपृष्ठांकन करणे रू. ८,३५,६६६/–

एमएसईबी वाहिन्यांचे खंदकांचे पुर्नपृष्ठांकन करणे रू. ८,३५,६६६/–

नली सफाई खर्च रू. ७,०३,०००/–

बीवीएम, थर्माप्लॉस्टिक पेंट खर्च रू. १८,२४,१४७/–

उपरोक्त बाबी दर्शवून अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ केली आहे. प्रथम अंदाजपत्रक तयार करतांना उपरोक्त सर्व बाबी विचारात घेवून अंदाजपत्रक

Scan with Fast Scan

बनविणे आवश्यक होते. त्यामुळे अंदाजपत्रक अचूक व वास्तववादी नसल्याचे दिसून आले.

६) विशेष अटी व शर्तीमधील क्र. ७ नुसार डांबरीकरण केलेल्या कामाचा डिफेक्ट लायाबिलीटी कालावधी ३ वर्षाचा आहे. शहर अभियंता, उमपा यांचे पत्र क्र. ४१९/२०१३ दि. ०५/०३/२०१३ अन्वये काम केलेल्या रस्त्यामध्ये काही ठिकाणी खड्डे पडले असल्याचे शहर अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी केले असता निदर्शनास आले असल्याचे नमूद आहे. त्यामुळे काम गुणवत्तापुर्वक झाल्याची खात्री होत नाही. नगरविकास विभाग शा.नि. दि. २/०३/२००९ नूसार त्रयस्थ पार्टीकडून कामाची तपासणी झालेली नाही.

९) कामामध्ये गौण खनिज साहित्याचे १७२.८० घ.मी. परिमाण वापरले आहे. सदर बाबीचे दर निश्चित करतांना बेसिक रेटमध्ये रॉयल्टी समाविष्ट केलेली आहे. त्यामुळे महसूल व वनविभाग यांची अधिसुचना दि. १०/०२/२००३ व शा.नि.क्र.गौण खनीज/१०/१००९/सीआर/३०९/ख दि. ११/२/२०१० अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी व मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन(रॉयल्टी) ची रक्कम रू. ७०.६७ प्रती घ.मी. दराने रू.१२,२१२/- शासन खाती भरणे बंधनकारक आहे. याची खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही अथवा पुरावे सादर केलेले नाहीत. त्यामुळे ठेकेदारास केलेले प्रदान हे नियमबाहय आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

# सार्वजनिक बांधकाम विभाग

परि.क्र.४

विषय:– बांधकाम विभागातील ठेकेदरांची देयके प्रदान करतांना व्हॅट कर व विमा कर १ टक्का कमी वसूल केल्या बाबत

महानगरपालिकेतील बांधकाम विभागातील ठेकेदारांची प्रदान देयके व प्रकाणके तपासली असता काही देयकामधून महाराष्ट्र मुल्यवर्धित कर हा ५ टक्के ऐवजी ४ टक्के दराने वसूल केलेला आहे. महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, २००२ व विक्रीकर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची अधिसूचना क्रमांक २२ दि. ४ एप्रिल २०१२ अन्वये महाराष्ट्र मुल्यवर्धित कर हा(VAT) हा दिनांक १ एप्रिल २०१२ पासून ४टक्के ऐवजी ५टक्के करण्यात आलेला आहे. तरी खालील प्रदान देयकातून महाराष्ट्र मुल्यवर्धित कर हा ५ टक्के ऐवजी ४टक्के दराने वसूल केलेला आहे. तरी खालील ठेकेदाराकडून १टक्का कमी वसूल केलेला मुल्यवर्धित कर वसूल करून शासनास जमा करावा.

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | प्रमाणक क्र. व दिनांक | देयकाची रक्कम | वसूल केलेला मु.कर | देय मुल्यवर्धित कर | वसूल करावयाचा १% मु.कर |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | रविराज म. का.स.संस्था | ४८२४/ १५.०३.१३ | ४४०००० | १७६०० | २२००० | ४४०० |
| २ | शिवलिंग म. का.स.संस्था | ३२३१/ २. ११.१२ | ६५९७३० | २६३८९ | ३२९८७ | ६५९८ |
| ३ | जयदुर्गा मा | ८५९/२८. | १२०२५ | ४८८१ | ६१०१ | १२२० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | म.ग्राहक संस्था | ०५.१२ | | | | |
| ४ | शिव म.का. स.संस्था | ४९६६/२१. ०३.१३ | ४४७४८१ | १७८९९ | २२३७४ | ४४७५ |
| ५ | जागरूक महिला मंडळ | १३२४/०४. ०७.१२ | २४२५०४ | ९७०० | १२१२५ | २४२५ |
| ६ | जागरूक महिला मंडळ | १७८९/०९. ०८.१२ | २३९२४५ | ९५७० | ११९६२ | २३९२ |
| ७ | जागरूक महिला मंडळ | १७९०/ ०९.०८.१२ | २३६१२५ | ९४४५ | ११८०६ | २३६१ |
| ८ | जागरूक महिला मंडळ | ११०४/ १४.०६.१२ | ५६१२५ | ६२४५ | ७८०६ | १५६१ |
| ९ | जागरूक महिला मंडळ | ११०५/१४. ०६.१२ | ३६३२६ | १४५३ | १८१६ | ३६३ |
| १० | सुर्या ज्योती म.संस्था | १०६९/ १२.०६.१२ | ६६०००० | २६४०० | ३३००० | ६६०० |
| ११ | गुरूराज म.स. संस्था | ४५७/०४. ०५.१२ | १०७८९८६ | ४३१५९ | ५३९४९ | १०७९० |
| १२ | रेणुकामाता म. स.संस्था (विदयुत) | ४९३०/२९. ०३.१३ | ७४५२५२ | २९८१० | ३७२६३ | ७४५३ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १३ | हरी हरेश्वर म.स.संस्था | ३८५३/०८.०१.१३ | ५५०००० | २२००० | २७५०० | ५५०० |
| | | एकुण वसूलपात्र मुल्यवर्धित कराची रक्कम | | | | ५६१३८ |

२) महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे परिपत्रक क्र.जी.इ.एन. १०९८/१३५७/प्र.क्र.१६६/९८ नवि–२५ दिनांक ३/११/२०१३ अन्वये ठेकेदाराने कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरविणे बंधनकारक आहे. ठेकेदाराने कामाचा विमा उतरविला नसल्यास त्यांच्या देयकांच्या रक्कमेतून १टक्का विमा रक्कम वसूल करून ती रक्कम महाराष्ट्र शासनाच्या खाती जमा करणे आवश्यक आहे. खालील नमूद केलेल्या यप्रकरणात ठेकेदाराने कामाचा विमा उतरविलेला नाहि व त्यांच्या देयकातून १टक्का विमा रक्कम देखिल कापलेली नाही. तरी सदरहू रक्कम ठेकेदाराकडून वसूल करून शासनास जमा करावी.

| अ. क्र. | ठेकेदाराचे नाव | प्रमाणक क्र. व दिनांक | देयकाची रक्कम | १%वसूल करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | जागरूक महिला मंडळ | १३२४/ १४.०७.१२ | २४२५०४ | २४२५ |
| २. | जागरूक महिला मंडळ | १७८९/०९.०८.१२ | २३९२४५ | २३९२ |
| ३. | जागरूक महिला मंडळ | १७९०/०९.०८.१२ | २३६१२५ | २३६१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | जागरूक महिला मंडळ | २२६५/१३.०९.१२ | ५१७३९६ | ५१७३ |
| एकुण वसूलपात्र १टक्का विमा रक्कम रू. | | | | १२३५१ |

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

परि. क्र. ०५

विषय:— प्र.क्र.११ मधिल सावित्रीबाई फुले नगर येथे समाजमंदिर बांधणे कामातील अनियमितता

प्रभाग क्र.११ मधील सावित्रीबाई फुले नगर येथे समाज मंदिर बांधणे कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता उणिवा/त्रृटी निदर्शनास आलेल्या आहेत.

कामाचे नाव:— प्र.क्र. ११ मधील सावित्रीबाई फुले नगर यथे समाज मंदिर बांधणे

प्रमाणक क्र. १०६९ दि. १२/०६/२०१२ रू.५८०८००/—

कंत्राटदाराचे नाव— सुर्यज्योत मजूर सह. संस्था मर्या.

अंदाजपत्रकीय रक्कम— रू. ६०००००/—

तांत्रिक मान्यता क्र व दि.— ३६९५ दि.१७/०३/२०१०

जिल्हा उपनिबंधक यांचे कामाचे वाटप पत्र क्र.४५८१ दि.२३/१२/२०१०

कामाचा कालावधी १२० दिवस काम पुर्ण दि. १०/०८/२०११

कार्यादेश क्र. २५३५ दि. ०४/०१/२०११

कार्यादेशातील अटी व शर्तीनुसार सदर काम कार्यादेशानंतर १२० दिवसात( दि.०५/०५/२०११पर्यंत) पूर्ण करणे आवश्यक असतांना दि. १०/०८/२०११ रोजी उशिराने पुर्ण झाले आहे. काम उशिराने पुर्ण केलेबाबत कंत्राटदारावर कोणतीही दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली नाही.

Scan with Fast Scan

२. बांधण्यात आलेल्या समाजमंदिराची नोंद महानगरपालिकेच्या मालमत्ता नोंदवहीत घेणे आवश्यक असतांना ती नोंद घेण्यात आलेबाबत मालमत्ता नोंदवही लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने पडताळणी करता आली नाही.

३. समाजमंदिराचे काम सुरू करणेपुर्वी नियोजित बांधकामाचे सर्व प्राथमिक अंदाज रेखाकित नकाशेसह उपलब्ध न झाल्याने मोजमाप नोंदवहीतील मापे योग्य असलेबाबत पडताळणी करता आली नाही.

४. महसूल व वनविभाग यांची अधिसुचना १०/०२/२००३ व शा.नि. क्र.गौण खनीज/१०/१००९/सीआर/३०९/ख दि.११/२/२०१० अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू खडी व मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) ची रक्कम शासन खाती भरणे बंधनकारक आहे याची खातरजमा बांधकाम विभागाकडून केलेली नाही. परंतु अशी गौण खनिज स्वामित्व धनाची रक्कम ठेकेदाराच्या देयकातून वसूल करून मनपाने शासन सदरी भरणा न केल्याने रू.७०.६७ प्रती घ.मी. प्रमाणे १७७.१९ घ.मी.करीता शासनाचे रू. १२५२२/– नुकसान झाले आहे.

५. कामाबाबतचे शहर अभियंता यांचे निरीक्षण अहवाल किंवा कामाच्या ठिकाणावरील नोंदवही लेखा परीक्षणाकरीता उपलब्ध झाले नसल्याने कामाच्या पर्यवेक्षणाबाबत खात्री होत नाही. तसेच सार्व.बांधकाम विभाग अधिनियमातील परी.क्र.२४ मधील नियम क्र.८(एच) नूसार झालेल्या कामाचे ५ टक्के तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक

Scan with Fast Scan

परंतू याबाबतची तपासणी केल्याचे अभिप्राय मोजमाप पुस्तिकेवर नोंदविलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

६. उपरोक्त कामातील बार्बीमधील वाळू व खडी यांची वाहतूक अनुक्रमे १६० किमी व ७ किमी वरील ठिकाणावरून केल्याचे दर पृथकरणपत्रात दर्शविले आहे. परंतू त्याबाबत वाहतूक पास व बांधकामात वापरलेल्या साहीत्याचे खरेदी चलन अभिलेख लेखापरीक्षणाकरीता उपलब्ध न झाल्याने साहित्यांची खरेदी खरोखरच केल्याची व वाहतूक १६० किमी व ७ किमी वरून झाल्याची पडताळणी करता नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

परि क्र.०८

## सार्वजनिक बांधकाम विभाग

विषय:– अग्निशमन विभागातील नेताजी चौक येथिल फायर स्टेशन बांधण्याचे काम विभागणी करून दोन मजूर सहकारी संस्था यांचे कडून नियमबाहय केल्या बाबत.

सन २०१२–१३ मध्ये फायर स्टेशन बांधणे करिता महानगरपालिकेने अंदाज पत्रकात रू.१ कोटी २५ लक्ष रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे. शासनाकडून सदरहू कामा करिता रू.४३ लक्ष ४५ हजार रूपये अनुदान (३५ टक्के हिस्सा) दिनांक ३१/०३/२०१५ रोजी प्राप्त झालेले आहे. व महानगरपालिकेने स्वत:चा हिस्सा रू.८१ लक्ष २५ हजार असे एकुण रू. १कोटी २५लक्ष खर्च करणे आवश्यक होते. तथापि महानगरपालिकेने वरिल कामाकरिता एकुण रू.३९ लक्ष ८९हजार एवढाच खर्च केलेला आहे. प्रमाणक क्र.४६१३ दि. २६/०२/२०१३ अन्वये रू.९९६५००/–मे. विश्वनाथ म.का.स.संस्था व प्रमाणक क्र. ३४१८ दि. ०५/१२/२०१२ अन्वये रू. १०९६०९९/– मे. धनलक्ष्मी म.का.स.संस्था यांना प्रदान केलेले आहेत. वरिल कामात खालील अनियमितता दिसून आल्या आहेत.

१) नेताजी चौक येथिल फायर स्टेशन बांधण्याचे काम विभागणी करून मे. विश्वनाथ मजूर का.स.संस्था व मे. धनलक्ष्मी मजूर का.स.संस्था यांना एकच काम विभागून देण्यात आलेले आहे. का.आ.क्र. UMC/PWD/EE 89 व का.आ.क्र. UMC/PWD/EE 54 दि. २०/११/२०१२ अन्वये आदेश देण्यात आलेले आहेत.

Scan with Fast Scan

२) प्रमाणक क्र. ४६१३ मधिल देयकातील बाब क्र.१४ रू. १२८१४८/– प्राकलनात समाविष्ट केलेली नाही.

(P/A plastic allumsion paint of aap. Colour Quantity -823.95 Rate 155.53= 128148 )

३) बांधकाम केलेली फायर स्टेशनची जागा महानगरपालिकेची मालकीची असल्याची नोंद नस्तीत दिसून आलेली

४) काम पूर्ण झालेल्या फायर स्टेशनचे महानगरपालिकेच्या नावे मालमत्तेत नोंद झाल्या बाबतचे अभिलेख नस्तीत आढळून आलेले नाहीत.

५) का.आ.क्र. UMC/PWD/EE 54 दि. 20/11/2012 अन्वये मे. धनलक्ष्मी म.का.स.संस्था यांना कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. तथापि सदरहू संस्थेस दिलेल्या कामास जिल्हा निबंधक ठाणे यांचे मंजुरी आदेश घेण्यात आलेले नाहीत. तरी सदरहू बाब हि नियमाबाहय आहे.

६) एकाच क्र. ४६१३ मधिल देयकातील बाब क्र. १४(P/A plastic allumsion paint of aap. Color Quantity -823.95 Rate 155.53= 128148 ) चे दर हे १५५.५३ असे आकारलेले आहेत तथापि जिल्हा दर सूची २०११–१२ मध्ये सदरहू बाबी करिता ५५.५३ असे दर आहेत. त्यामुळे रू. ८२,३९४/– चे जादा प्रदान ठेकेदारास झालेले आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि क्र. ०७

## सार्वजनिक बांधकाम विभाग

विषय— उल्हासनगर क्र. ३ राधास्वामी सत्संग हॉल ते साईबाबा मंदिर पर्यंत रस्त्यांच्या सिमेंट कॉक्रिटीकरण कामातील अनियमितता

उल्हासनगर महानगरपालिकेचे सन २०१२—१३ या वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षण स्थानिक निधी परीक्षा विभागामार्फत दि. २७/०२/२०१५ पासून हाती घेण्यात आले आहे. उल्हासनगर क्र.३ राधास्वामी सत्संग हॉल त साईबाबा मंदिर पर्यंत रस्त्याच्या सिमेंट कॉक्रिटकरण करणे कामाच्या नस्तीचे लेखापरीक्षण केले असता उणिवा खालीलप्रमाणे निदर्शनास आलेल्या आहेत.

कामाचे नाव— मुलभुत सुविधा विकास योजनेतर्गत उल्हासनगर क्र३ राधास्वामी सत्संग हॉल ते साईबाबा मंदिर पर्यंत रस्त्याच्या सिमेंट कॉक्रिटीकरण करणे.

अंदाजपत्रकीय रक्कम रू. ३३२९१५३०/—

कंत्राटदाराचे नाव — मे. मोनिका कंस्ट्रक्शन लि.

कार्यादेश क्र. व दिनांक — २३९५ दि. १५/०४/२०११

कामाचा कयालावधी — १२ महीने

मोजमाप नोंदवही क्र. ३२१६

प्रथम धावते देयक प्रमाणक क्र. २४९५ दि. ०१/२०/२०१२ रू. २३९१३८२/

१) कामाची मुदत १२ महिने असतांना लेखापरीक्षण वर्ष अखेरपर्यंत काम पुर्ण झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे देण्यात आलेल्या मुदतवाढीबाबत स्थायी समितीची मंजूरीचे अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिले नाही. बँक गॅरंटीची मुदत वाढविणेबाबत कागदपत्र लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिले नाही .

Scan with Fast Scan

२) अंदाजपत्रकीय कामास व रक्कमेस तांत्रिक मंजूरी लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिली नाही

३) प्राप्त निवीदाकारांमधील मे. मोनिका कंन्स्ट्र. लि. यांची निवीदा सर्वात लघुत्तम म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा +४५ टक्के असल्याने त्यांना वाटाघाटीकरीता बोलविण्यात आल्यानंतर त्यांनी +२७ टक्के दराने काम करण्यास सहमती दर्शविली आहे. २७ टक्केचे दर विश्लेषण मे. मोनिका कंन्स्ट्र यांनी खालीलप्रमाणे दिले आहे.

ए) अंदाजपत्रके तयार करतांना जिल्हा दरसुचीमधील सर्वसाधारण टिप ३ नुसार मुल्यवर्धित करासह दरसुची निश्चित केली आहे. असे असतांना ५ टक्के व ४ टक्के मधील फरकाचा मुल्यवर्धित कराचा १टक्के जादा दराचा समावेश केला आहे. नोंदणीकृत कंत्राटदारांच्या २ टक्के मुल्यवर्धित करात कोणतीही वाढ झाली नसल्याने व कंत्राटदारास १ टक्के जादा दर दिल्याने कंत्राटदारास ३ टक्के जादा प्रदान झाले आहे.

बी) कामगारांचा व कामाचा विमा रक्कम अंदाजपत्रकीय रकमेच्या अधिक एक टक्का विचारात घेवून प्रदान करण्यात आले आहे. परंतू कामाचा व कामगारांचा विमा काढण्याची जबाबदारी कंत्राटदाराची असल्याने सदर बाबीकरीता एक टक्के जादा रक्कम अदा केल्याने अतिप्रदान झाले आहे.

सी) महसूल व वन विभागाच्यां दि.११/०२/२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे रॉयल्टीच्या दरात वाढ झाल्याने फरकाची रक्कम अंदाजपत्रकीय रकमेच्या + १०.०९ टक्के जादा प्रदान करण्यात आली आहे.

Scan with Fast Scan

ड़ी) सन २००९–१० व सन २०१०– ११ च्या जिल्हा दर सूची मधिल फरक अंदाजपत्रकीय रकमेच्या + १०.२ टक्के विचारात घेवून प्रदान करण्यात आले आहे. सदर वाढीची टक्केवारी कोणत्या निकषावर आधारीत आहे, याबाबत अभिलेख उपलब्ध करून दिले नाही

इ) सेवाकराची रक्कम अंदाजपत्रकीय रकमेच्या अधिक ३.४२ टक्के समाविष्ट करण्यात आले आहे. दरसूची मधिल बार्बीचे दर हे संपूर्ण बाब म्हणून मंजूर आहे. त्यामुळे स्वतंत्र सेवाकर समाविष्ट करणे योग्य नाही.

४) मुद्रांक शुल्क आधिनियम १९५८ मधिल कलम ६३ नुसार कंत्राटदाराने करार नाम्याची रक्कम रू. ४२२८०२४३/– चा करारनामा रू. ४१,४००/– चे मुद्रांक पेपरवर करण्याचे असतांना रू.८४००/– च्या मुद्रांक पेपरवर केल्याने उर्वरित रक्कम ३३०००/– रूपये शासन जमा करणे आवश्यक आहे.

५) निविदा chapter 11 मधिल ९ नुसार निविदा कालावधी १२० दिवसांचा आहे. निविदा जाहिरात दि. १३/०८/२०१० रोजी प्रसिध्द केली असून परंतू कार्यादेश दि. १५/०४/११ रोजी उशिराने दिले आहे. निविदा अटींचा भंग झालेला आहे.

६) विशेष अटी व शर्तीमधिल क्र. ७ नुसार सिमेंट, कॉंक्रिटीकरण केलेल्या कामाचा डिफेक्ट लायाबिलिटी कालावधी ५ वर्षाचा आहे. कार्य.अभियंता, उमपा, यांचे पत्र क्र.९९७ दि. १६/१२/११ अन्वये काम केलेल्या रस्त्यामध्ये काही ठिकाणी तडे गेले असल्याचे कार्य.अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी केले असता निदर्शनास आले असल्याचे नमुद आहे. त्यामुळे काम गुणवत्तापुर्वक झाल्याची खात्री होत नाही. नगरविकास विभाग शासन निर्णय दि. २/३/२००९ अन्वये

Scan with Fast Scan

त्रयस्त पार्टीने कामाचे लेखापरिक्षण करणे आवश्यक आहे. त्याचे पालन झाले नाही.

७) कामामध्ये गौणखनिज साहित्याचे १९२३.५० घ.मि. इतके परिमाण वापरले आहे. सदर बाबीचे दर निश्चित करतांना बेसिक रेटमध्ये रॉयल्टी समाविष्ट केलेली आहे. त्यामुळे महसूल व वनविभाग यांची अधिसुचना दि.१०/२/२००३ व शा.नि.क्र.गौणखनिज/१०/१००९/सी आर/३०९/ख दि. ११/२/२०१० अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी व मुरूम इत्यादी गौणखनिजांचे स्वामीत्व धन(रॉयल्टी) ची रक्कम रू.७०.६७ प्रती घ.मि. दराने रू. १३५९३४/– शासन खाती भरणे बंधनकारक आहे. याची खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही. अथवा पुरावे सादर केलेले नाही. त्यामुळे ठेकेदारास केलेले प्रदान हे नियमबाहय आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि. क्र. ०८

## सार्वजनिक बांधकाम विभाग

विषय:– साईबाबा चौक ते मुरबाड रोड व्हाया धोबी घाट मंडळ रस्त्याचे पुर्नपुष्ठांकन करणे कामातील अनियमितता

साईबाबा चौक ते मुरबाड रोड व्हाया धोबी घाट मंडळ रस्त्याचे पुर्नपुष्ठांकन करणे कामाच्या नस्तीचे लेखापरिक्षण केले असता उणिवा खालील प्रमाणे निर्दशनास आलेले आहे.

अदांजपत्रकीय रूक्कम रू. ५८२१८००/–

कंत्राटदाराचे नाव – मे. कोणार्क इंन्फॉस्ट्रचर प्रा. लि.

कार्यदेश क्र. व दिनांक – ३५०१ दि. ०३/०१/२०१२(+ ७ टक्के )

कामाचा कालावधी – १५० दिवस

मोजमाप नोंदवही क्र. २७६८

प्रथम धावते देयक प्रमाणक क्र. ३७८६ दि. ०१/०१/२०१३ रू. ३८६४०००/

प्रमाणक क्र. ४१२३ दि. २१/१/२०१३ रू. १००२४३२/–

१) कामाची मुदत १५० दिवस असतांना लेखापरिक्षण वर्ष अखेरपर्यत काम पूर्ण झाले नसल्याचे निर्दशनास आले आहे. त्याचप्रमाणे देण्यात आलेल्या मुदतवाढीबाबत स्थायी समितीची मंजूरीचे अभिलेख लेखापरिक्षणास अप्राप्त आहे. बॅक गॅरंटीची मुदतवाढदिले बाबत कागदपत्र लेखापरिक्षणास अप्राप्त आहे.

२) अंदाजपत्रकानुसार १००० मि.लांबी, रूंदी ०.६ मि. व खोली ०.३ मि. इतके रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे असतांना १३०० मि. लांबीचा रस्त्याचे डांबरीकरण

Scan with Fast Scan

कोणत्याही मंजूरीविना करण्यात आले आहे. जादा कामास स्थायी समितीची मंजूरी घेण्यात आलेली नाही. त्यामुळे कामाचे केलेले प्रदान हे नियमबाहय आहे.

३) वित्त विभाग शा.नि. विकास/१०९८/प्र.क्र. २९/९८/शासन हमी दि. १९/८/१९९८ नुसार कामाचा व कामागाराचा विमा १टक्के रक्कम रू. ५३३५३/– देयकातून कपात करणे आवश्यक आहे.

४) विशेष अटी व शर्तीमधिल क्रमांक ७ नुसार डांबरीकरण केलेल्या कामाचा डिफेक्ट लायाबिलिटी कालावधी ३ वर्षाचा आहे. कार्य.अभियंता, उमपा, यांचे पत्र क्र.३५०१ दि.२८/४/२०१४ अन्वये काम केलेल्या रस्त्यामध्ये काही ठिकाणी खड्डे पडले असल्याचे कार्य.अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी केले असता निर्दशनास आले असल्याचे नमुद आहे. त्यामुळे काम गुणवत्ता पूर्वक झालेले नाही. नगरविकास विभाग शा.नि.क्र.संकिर्ण– २००८/१३३८/प्र.क्र. १७१/नवि २० दि. ०२/३/२००९ अन्वये ५० लाखांवरील कामाचे त्रयस्त पार्टी कडून तपासणी किमान १०टक्के करणे बंधनकारक आहे. त्याचे पालन झालेले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि.क्र.०९

## सार्वजनिक बांधकाम विभाग

विषय:— आमदार विकास निधी अंतर्गत प्रभाग क्र.५७ सेक्शन ३२ येथिल नाभिक समाजाची वस्ती असलेल्या भागात सामाजिक सभागृह बांधणे कामातील अनियमितता बाबत.

सन २०११— २०१२ साठी आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमा अंतर्गत नाभिक समाजाची वस्ती असलेल्या भागात सामाजिक सभागृह बांधण्यात आलेले आहे. मे. प्रतेश मजूर का.स.संस्था यांना प्रमाणक क्र.१४१६ दि.१७/७/२०१२ अन्वये रू. ४९९६९७/— प्रदान केलेले आहेत. कामात खालील अनियमितता दिसून आलेली आहे.

१) जिल्हाधिकारी यांचे प्रशासकिय मान्यता आदेशातील अट क्र.५ नुसार आमदार विकास निधी कार्यक्रमा अंतर्गत घेण्यात येणारे बांधकाम महानगरपालिकेच्या जागेतच घेता येईल असे नमूद आहे. खाजगी संस्थेच्या जागेवर घेता येणार नाही. तथापि वरिल सामाजिक सभागृह बांधकाम हे खाजगी नाभिक समाजाच्या संस्थेच्या मोडकळिस आलेल्या इमारतीवर केलेले नस्तीतील अभिलेख्यावरून दिसून येत आहे. तसेच नाभिक संस्थेचे प्रतिज्ञापत्र दिलेले आहे. त्यामुळे सदर अटीचे पालन झालेले नाही. बांधकाम केलेली जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याचे कागदपत्र नस्तीमध्ये दिसुन आले नाही.

२) सदरचे काम कार्याआदेश क्र.३६२५ दि.२/१/२०१२ अन्वये दिलेले आहे. तथापि कामाचा विमा दि.२५/६/२०१२ रोजी उशिराने उतरविलेला आहे. वित्तविभाग शासन निर्णय क्र. १०९८/प्र.क्र. २२८९/शा. हमी दि. १९/८/१९९८ व नगरविकास विभाग शासन पत्र क्र.

ठेकेदाराच्या देयकातून १टक्के विमा निधी रू. ४९९७/– वसूल करणे आवश्यक आहे.

३) कामाची मुदतवाढ दि. १०/०७/२०१२ पर्यंत दिलेली आहे. परंतू मुदतवाढीच्या अर्जावर दिनांक/आवक क्रमांक नाही. कार्यालयीन टिपणीवर दिनांक नाही. मुदतवाढीचे कारण संयुक्तीक नाही. कार्यादेशातील कामाची मुदत ९०दिवस असून ०१/०४/२०१२ रोजी संपली असून विलंब कालावधीसाठी दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक आहे.

४) सामाजिक सभागृह महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याची मालमत्तेत नोंद घेतल्याचे अभिलेखे प्राप्त झाले नाही.

५) सामाजिक सभागृहाचे परिक्षण व देखभाल दुरूस्ती महानगरपालिका स्वत: करते किंवा अन्य संस्था याबाबतची माहिती उपलब्ध करण्यात यावी.

६) बांधकामात गौणखनिज साहित्य ८४.९५ घ.मि. इतके वापरले आहे. परंतू त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री केलेली नाही. अथवा पुरावे नस्तीत जोडले नाहीत. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग मुंबई यांची अधिसूचना दि. १५/१/२००३ व शासन परिपत्रक दि. ११/२/२०१० चे पालन केलेले नाही.(८४.९५X७०.६७ = ७३४७/–) सदर तरतूदीचे पालन न करताच ठेकेदारास प्रदान केल्याने झालेले प्रदान हे नियम बाहय आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि. क्र.१०

# सार्वजनिक बांधकाम विभाग

विषय:— बांधकाम विभागातील प्र.क्र.५२ मधिल आर.के.कम्पाउंड जवळ ४शीटचे शौचालय बांधणे कामातील अनियमितता बाबत

ठेकेदाराचे नाव:— रविराज मजूर का.स.संस्था

डि.डि.आर.काम वाटप आदेश क्र. :— ५६५४ दि. १४/०२/२०११

कामाचा कार्य आदेश:— २६५८ दि. २५/०२/२०११

कामाचा कालावधी :— ९० दिवस

काम पूर्ण झाल्याची तारीख:— दि. १८/०४/२०११

प्रमाणक क्र:— ४८२४ दि. १५/०३/२०१३ रू. ४४००००/—

प्रमाणक क्र:— ४८२४ दि. १५/०३/२०१३ रू. ४४००००/— तपासले असता त्यात खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

१) प्रदान देयक रू.४४००००/— वर VAT मुल्यवर्धित कर ५ टक्के वसुल करणे आवश्यक असतांना ४ टक्के दराने वसूली केलेली आहे. त्यामुळे ठेकेदाराकडून १ टक्के VAT रू. ४४००/— वसूल करणे आवश्यक आहे.

२) सदर कामाची प्राकलन रक्कम रूपये ३९९९५६/— असून एकुण कामाचा खर्च रू. ४४००००/— म्हणजेच १० टक्के वाढ करून देण्यात आलेला आहे. परंतू रक्कम वाढीबाबतची सबळ कारणे नस्तीत नमूद नाही.

३) कामाचा कार्यआदेश व खर्चाची तरतूद २०११—२०१२ मधिल आहे. तथापि प्रत्यक्ष प्रदान २०१२—१३ च्या तरतूदीतून केलेली आहे. स्पील ओव्हर कामासाठी तरतूद अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट नाही.

Scan with Fast Scan

३) कामाचा कार्यआदेश व खर्चाची तरतूद २०११–२०१२ मधिल आहे. तथापि प्रत्यक्ष प्रदान २०१२–१३ च्या तरतूदीतून केलेली आहे. स्पील ओव्हर कामासाठी तरतूद अर्थसंकल्पामध्ये समाविष्ट नाही.

४) कामात गौण खनिज साहित्य ३७.१४ घ.मि. इतके वापरले आहे. परंतू त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री केलेली नाही. अथवा पुरावे नस्तीत जोडले नाहीत. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग यांची अधिसूचना दि. १५/०१/२००३ व शासन परिपत्रक दि. ११/२/२०१० चे पालन केलेले नाही.(३७.१४ X ७०.६७ =२६२५) सदर तरतुदीचे पालन न करता ठेकेदारास देयक प्रदान केलेले आहे. हे नियमबाहय आहे.

५) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. जीईएन १०९८/१३५७/प्र.क्र. १६६/९८/नवि–२४ नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई–३२ दि. ३.११.२००३ नुसार ठेकेदाराने कंत्राट कामाचा व सर्व कामगारांचा विमा कामगार नुकसान भरपाई विमापत्राखाली उतरविणे आवश्यक आहे. तथापि सदरहू प्रकरणात फक्त कंत्राट कामाचा विमा उतरविलेला आहे. कंत्राटी कामगारांचा विमा उतरविल्या बाबतचे पेपर्स नस्तीत नाहित. तरी १टक्का रक्कम रू.४४००/– ठेकेदाराकडून वसूल केल्याचे अभिलेख नाहीत. पूर्तता करावी.

६) मटेरीअल तपासणी अहवाल फक्त M 20 RCC BEAM मध्ये घेतलेला आहे. परंतु पेव्हर ब्लॉक 60 MM या बाबींचा तपासणी अहवाल घेण्यात आलेला नाही.

७) मोजमाप पुस्तिकेतील खालील काही बाबींचे परिमाण हे प्राकलनातील परिमाणापेक्षा १२५ टक्के पेक्षा जास्त झालेले आहे. बाबींचे परिमाण वाढीची

Scan with Fast Scan

करणे नमूद केलेली नाहीत. सदर काम करण्यापूर्वी कार्यकारी अभियंता यांची पूर्व मान्यता घेतली नाही. सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिका नियम २२७ नुसार मान्यता घेतली नसताना बिलप्रदान करणे हे नियमबाहय आहे त्यामुळे ठेकेदारास रू.२३३५६/– मंजूर प्राकलन रक्कमेपेक्षा जास्त प्रदान केलेले आहे.

| अ. क्र. | बाब व तपशिल | प्राकलनतील परिमाण | प्रदान दर | मोजमाप पुस्तकातील परिमाण | प्रदान रक्कम | देय रक्कम रू. | अतिप्रदान रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 10 | पी 2nd cl BB Masonary cm 1.6 Foundation | 6.61 घ.मि. | 2996 घ.मि. | 13.22 | 39608 | 19804 | 19804 |
| 15 | पी/ 12 mm cementplaster with Neru | 18.90 | 127.24 | 46.82 | 5957 | 2405 | 3552 |
| | | | | | | एकुण | २३३५६/– |

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

पारि.क्र.११ 

## सार्वजनिक बांधकाम विभाग

विषय:– जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियाना अंतर्गत शहरी गरीबांसाठी मुलभुत सुविधा पुरविणे

प्रशासकीय मान्यता रू. ३५.३८ कोटी केंद्रीय सुकाणु समिती दि. ३/२/२००९

निविदा मान्य रू.३२.८३ कोटी( २ कामे) स्थायी समिती ठराव क्र. ७४ दि. २४/६/२००९

कार्यादेश क्र. १६३०, १३६१ दि. २५/८/२००९( २ कामे )

कामाची मुदत – १८ महिने

ठेकेदार:– कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. मुंबई

जवाहारलाल नेहरू राष्ट्रीय शहरी पुनरूत्थान अभियान अंतर्गत शहरी गरीबांसाठी मुलभुत सुविधा पुरविणे ( बी.एस.यु.पी.)

अंतर्गत राहुल नगर, वाल्मिकी वसाहत येथिल ठिकाणी सदर योजने नुसार ६०० घरकुले बांधण्याचे प्रस्तावित असून त्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर कामाची निविदा नस्ती व खर्चाची प्रमाणके तपासली असता खालील उणिवा दिसून आल्या.

१) राहुल नगर येथे ३८७ घरकुल व वाल्मिकी वसाहत येथिल २१३ घरकुले अशी एकुण ६०० घरकुले बांधण्याचे कार्यादेश दि. २५/८/२००९ रोजी कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर लि. मुंबई यांना दिले आहे. सदर कामे सुरू करण्यासाठी व कामात गती येणे कामी मोबीलायजेशन अग्रीम देणेबाबत निविदा पुर्व बैठकीत

Scan with Fast Scan

निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार रू. १.६४ कोटी मोबीलायजेशन अग्रीम प्रमाणक क्र. ३४३३, ३४३४ दि. १/११/२०१० अन्वये प्रदान केले आहे. याबाबतची बॅक हमी घेतली नाही.

२) दिलेले अग्रीम किती टक्के व्याज दराने दिले याचा उल्लेख नस्तीत नसुन मोबीलायजेशन अग्रीमाचे मुद्दल व व्याज वसुली केली नाही.

३) मान्य निविदा अनुक्रमे रू. २१,४७,००,७०८ व रू. ११,३५,८१,५३६ दोन स्वतंत्र असून प्रत्येकी रू. १०० च्या मुद्रांक पेपरवर करारनामे केले आहे. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम १९५८ मधिल कलम ६३ नुसार रू. ३,२६,३००/ वसुली करणे बाकी आहे.

४) निविदा अटी शर्ती नुसार सुरक्षा अनामत रक्कम २.५ टक्के बॅक हमी स्वरूपात घेण्याचे आदेश असून त्यानुसार अनुकमे रू. ६३,६९,१७५ व २८,३९,५४०/– अशी एकुण रू. ९२,०८,७१५/– बॅकहमी घेतली आहे. त्याची वैधता दि. २४/८/२०११ रोजी समाप्त झाली आहे. त्याचे नुतनीकरण केलेले नाही. तसेच बॅक हमीचे दस्तऐवज नोंदणीकृत करून मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियमय १९५८ मधील कलम ४० नुसार प्रति हजारास रू.५/– प्रमाणे रू. ४६०४४/– मुद्रांक शुल्क वसूल केले नाही.

५. राहुलनगर येथील कामगाराचा विमा दि.३/३/२०१० ते २/९/२०१० या कयालावधीचा ४० कामगाराचा उतरविला आहे. कामाचा विमा काढलेला नाही तसेच वाल्मिकी वसाहत येथील दि. १९/८/१३ ते १८/२/१५ असा विमा आहे. कामाच्या आदेशापासून विमा काढलेला नाही. नगरविकास विभाग

Scan with Fast Scan

शासन निर्णय क्र. जीईएन–१०१८/१३५७/प्र.क्र.१६६/९८/नवि– २८ दि. ३/११/२००३ अन्वये कामाचा कंत्राटी कामगारांचा विमा उतरविलेला नाही. अंदाजपत्रकाच्या १ टक्का विम्याची रक्कम वसूल करणे यावी.

राहुलनगर येथे इमारत बांधकाम खर्च रू. १४१२१/– मंजुर केला असल्याचे नस्तीत दिसून येत नाही.

६) सदर योजनेसाठी केंद्रशासन व राज्य शासन ६,२५,७७,०००/– निधी वितरीत झाला होता. वेळेत खर्च केला नाही. परंतु राहुल नगर येथील जागा ताब्यात आली नाही. तेथील रहीवासी यांच्या विरोधामुळे काम बंद असल्याचे नस्तीत दिसते. मनपा यांच्या पाठपुराव्या अभावी सदर योजना शासनाने रद्द केली वितरित निधी व्याजासह परत करण्याचे आदेश दिले. त्यानुसार रकमा परत केले आहेत. परंतू रू.४१,५२,५८६ व्याज कसे परिगणना केली याचे अभिलेखे नाही.

७) गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र. जनेवा– २००७/प्र.क्र.५२/गृनिधा–२ दि. २५/६/२००७ मधिल अंमलबजावणी क्र.५ नुसार १० टक्के लाभार्थी हिस्सा घेतलेला नाही शासन निर्णयाचे पालन केलेले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

शासन निर्णय क्र. जीईएन–१०१८/१३५७/प्र.क्र.१६६/९८/नवि– २८ दि. ३/११/२००३ अन्वये कामाचा कंत्राटी कामगारांचा विमा उतरविलेला नाही. अंदाजपत्रकाच्या १ टक्का विम्याची रक्कम वसूल करणे यावी.

राहुलनगर येथे इमारत बांधकाम खर्च रू. १४१२१/– मंजुर केला असल्याचे नस्तीत दिसून येत नाही.

६) सदर योजनेसाठी केंद्रशासन व राज्य शासन ६,२५,७७,०००/– निधी वितरीत झाला होता. वेळेत खर्च केला नाही. परंतु राहुल नगर येथील जागा ताब्यात आली नाही. तेथील रहीवासी यांच्या विरोधामुळे काम बंद असल्याचे नस्तीत दिसते. मनपा यांच्या पाठपुराव्या अभावी सदर योजना शासनाने रद्द केली वितरित निधी व्याजासह परत करण्याचे आदेश दिले. त्यानुसार रकमा परत केले आहेत. परंतू रू.४१,५२,५८६ व्याज कसे परिगणना केली याचे अभिलेखे नाही.

७) गृहनिर्माण विभाग शासन निर्णय क्र. जनेवा– २००७/प्र.क्र.५२/गृनिधा–२ दि. २५/६/२००७ मधिल अंमलबजावणी क्र.५ नुसार १० टक्के लाभार्थी हिस्सा घेतलेला नाही शासन निर्णयाचे पालन केलेले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

७) निविदेमध्ये अट क्र.१९ नुसार भाव वाढ देय नसतांना स्थायी समिती ठराव क्र. २३, २५ दि. १५/९/१२ अन्वये स्टार रेट मंजूर केला आहे. हे नियम बाहय आहे.

८) निविदा अट क्र.८ नुसार कामात वापरल्याचे तपासणी अहवाल नाही. काम गुणवत्ता पुर्व झाल्याची खातरजमा करता आली नाही.

९) सार्व. बांधकाम विभाग मंत्रालय शासन परिपत्रक क्र. संकीर्ण–२०११/प्र.क्र. ४६७/रस्ते–१ दि. २१/११/२०११ नुसार खालील मुदयांचा खुलासा करावा.

अ) परिपत्रक मधिल अट ३ अन्वये कामाचा दोष निवारण कालावधी ०२ वर्षाचा असणे बंधनकारक आहे. परंतू निविदा अट क्र. २० नुसार १वर्षाचा ठेवला आहे. तसेच पुढील वर्षी नविन निविदा काढली आहे.

ब) अ.क्र.२(ड) नुसार कामात वापरलेल्या डांबरांची चलने उपलब्ध करून देण्यात यावी.

क) अ.क्र.४(अ) नुसार रस्त्याचे खड्डे भरणेपुर्वी व काम पुर्ण झाल्यानंतर छायाचित्रे काढण्यात आली असल्यास ती नस्तीमध्ये उपलब्ध झाली नाही.

१०) खड्डे भरण्याच्या कामात गौण खनिज साहित्य २६२०.४६ घ.मि. इतके वापरले आहे. परंतू त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री केलेली नाही. तसेच पुरावे नस्तीत जोडलेले नाही. दरसूची मध्ये बेसीक रेट रॉयल्टीच्या दराचा समावेश करून दरसूची निश्चित केली आहे. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग मुंबई यांची अधिसूचना दि. १५/१/२००३ व शासन परिपत्रक दि. ११/२/२०१० चे पालन केलेले नाही.

Scan with Fast Scan

११. नगरविकास विभाग शा.नि.क्र.जीईएन– १०१८/१३५७/प्र.क्र. १६६/९८/नवि–२८ दि. ३/११/२००३ अन्वये कामाचा व कंत्राटी कामगारांचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. त्याचे पालन झालेले नाही. अंदाजपत्रक रक्कम रू.१९९.९५ लाख १ टक्का रू. १,९९,९५० विम्याची रक्कम वसूल करावी.

१२) डांबराचा PLANT CALIBRASATION व तपासणीचे अभिलेख निविदा नस्तीत नसतांना निविदा मंजूर करणे नियम बाहय आहे.

१३) कार्यकारी अभियंता यांनी कामाची १०० टक्के तपसणी करणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय शासन परिपत्रक क्र. संकिर्ण– २०११/प्र.क्र. ४६७/रस्ते–१ दि. २१/११/२०११ मध्ये अट क्र.२ मधिल तरतूदींचे पालन झालेले नाही.

१४) करारनामा सील करण्यापूर्वी स्थायी समितीच्या सदस्यांच्या स्वाक्षरी घेतल्यानंतर करारनामा सील करण्यात येतो परंतू नगरसचिव यांनी सील केला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम –१९४९ मधील कलम ५(१) २ चे पालन झाले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

परि. क्र. १३

## सार्वजनिक बांधकाम विभाग

विषयः— उल्हासनगर १ ते ५ मधील मनपा चौक ते काटकेश्वर मंदिर व्हाया सी ब्लॉक चौक रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे कामातील अनियमितता

उल्हासनगर १ ते ५ मधील मनपा चौक ते काटकेश्वर मंदिर व्हाया सी ब्लॉक चौक रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे कामाच्या नस्तींचे लेखापरीक्षण केले असता उणिवा खालीलप्रमाणे निर्दशनास आलेल्या आहे.

कंत्राटदाराचे नाव :— मे. कोनार्क इन्फॉस्ट्रक्चर प्रा.लि.

तांत्रिक मान्यता क्र. व दि. ६२४४ दि. २७/०९/२०११

स्थायी समिती ठराव क्र.१०१ दि. १९/११/२०११

कार्यदिश क्र. व दिनांक— ३५०१ व दि २९/१२/२०११ (+७ टक्के)

कामाचा कालावधी— १५० दिवस मोजमाप नोंदवही क्र. २७८०

प्रथम धावते देयक प्रमाणक क्र. ३०३९ दि. ३/११/२०१२ रू.१७,८४,२१३/— चे ४ थे धावते देयक

१) कामाची मुदत १५० दिवस असतांना लेखापरिक्षण वर्ष अखेरपर्यंत काम पुर्ण झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे देण्यात आलेल्या मुदतवाढीबाबत स्थायी समितीची मंजूरीचे अभिलेख लेखापरीक्षणास अप्राप्त आहे.

२) वित्त विभाग शा.नि.विकास/१०९८/प्र.क्र.२९/९८/शासन हमी दि. १९.८. १९९८ नुसार विमा रक्कम रू. १९३९४/— देयकातून कपात करण्यात आलेली नाही.

३) अर्थ सॉईल मधील खोदाईतून १०१८.२१ घ.मी. माती निघाली असतांना खोदाईतून निघालेल्या १७७७.२१ घ.मी. ची वाहतूक केली आहे. जादा वाहतूक

Scan with Fast Scan

केलेल्या ७५९ घ. मी. ची. रू. ८२.४७/– प्रती घ. मी. प्रमाणे एकुण रू. ६२५९५/– इतक्या रकमेचे ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे.

४) प्रथम वेळी चार निविदाकारांच्या निवीदा प्राप्त झाल्या होत्या. चार मधील फक्त जयहिंद रोड बिल्डर्स वगळता इतर तिघांची निवीदा तात्रिक कागदपत्रे अपुर्ण असल्यामुळे अपात्र झाल्याने निविदा प्रक्रियेस मुदतवाढ दिल असता मे. कोनार्क इन्फ्रॉस्ट्रक्चर लि. व मे. जयहिंद रोड बिल्डर्स यांची निविदा प्राप्त झाली. कमीत कमी तिन निवीदा प्राप्त होणे आवश्यक असतांना शहर अभियंता यांनी कामाची निकड असल्याने निविदा उघडणेस शिफारस केली व मे. कोनार्क इन्फ्रॉस्ट्रक्चर लि. यांची निविदा +७ टक्के दराने मान्य करण्यात आली.

५) मुळ अंदाजपत्रकानुसार सदर कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू. १,८३,१४,४५०/– इतकी निश्चित असतांना खालील अतिरिक्त कामाकरीता अंदाजपत्रकात सुधारणा करून अंदाजपत्रकीय रक्कम रू. २,४८,३८,५००/– करण्यात आली आहे.

पाणी पुरवठा वाहिन्यांच्या खंदकांचे कामे रू. ५७,३४,९६६/–

महानगर गॅस वाहिन्यांचे खंदकांचे पुर्नपृष्ठांकन करणे रू. ८,३५,६६६/–

एमएसईबी वाहिन्यांचें खंदकांचे पुर्नपृष्ठांकन करणे रू. ८,३५,६६६/–

नली सफाई खर्च रू. ७,०३,०००/–

बीबीएम, थर्माप्लॉस्टिक पेंट खर्च रू. १८,२४,१४७/–

उपरोक्त बाबी दर्शवून अंदाजपत्रकीय रक्कमेत वाढ केली आहे. प्रथम अंदाजपत्रक तयार करतांना उपरोक्त सर्व बाबी विचारात घेवून अंदाजपत्रक

बनविणे आवश्यक होते. त्यामुळे अंदाजपत्रक अचूक व वास्तववादी नसल्याचे दिसून आले.

६) विशेष अटी व शर्तींमधील क्र. ७ नुसार डांबरीकरण केलेल्या कामाचा डिफेक्ट लायाबिलीटी कालावधी ३ वर्षाचा आहे. शहर अभियंता, उमपा यांचे पत्र क्र. ४१९/२०१३ दि. ०५/०३/२०१३ अन्वये काम केलेल्या रस्त्यामध्ये काही ठिकाणी खड्डे पडले असल्याचे शहर अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी केले असता निदर्शनास आले असल्याचे नमूद आहे. त्यामुळे काम गुणवत्तापुर्वक झाल्याची खात्री होत नाही. नगरविकास विभाग शा.नि. दि. २/०३/२००९ नूसार त्रयस्थ पार्टीकडून कामाची तपासणी झालेली नाही.

९) कामामध्ये गौण खनिज साहित्याचे १७२.८० घ.मी. परिमाण वापरले आहे. सदर बाबीचे दर निश्चित करतांना बेसिक रेटमध्ये रॉयल्टी समाविष्ट केलेली आहे. त्यामुळे महसूल व वनविभाग यांची अधिसुचना दि. १०/०२/२००३ व शा.नि.क्र.गौण खनीज/१०/१००९/सीआर/३०९/ख दि. ११/२/२०१० अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी व मुरूम इत्यादी गौण खनिजांचे स्वामित्व धन(रॉयल्टी) ची रक्कम रू. ७०.६७ प्रती घ.मी. दराने रू.१२,२१२/– शासन खाती भरणे बंधनकारक आहे. याची खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही अथवा पुरावे सादर केलेले नाहीत. त्यामुळे ठेकेदारास केलेले प्रदान हे नियमबाह्य आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक<br>
उल्हासनगर महानगरपालिका

पारि.क्र.१४

## सार्वजनिक बांधकाम विभाग

विषय:— उल्हासनगर ४ ओटी सेक्शन ते श्रीराम चौक पेट्रोल पंप पर्यंत रस्ता रूंदीकरण सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे कामातील अनियमितता

उल्हासनगर ४ ओटी सेक्शन ते श्रीराम चौक पेट्रोल पंप पर्यंत रस्ता रूंदीकरण सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे कामाच्या नस्तींचे लेखापरिक्षण केले असता खालील उणिवा निदर्शनास आल्या.

कंत्राटदाराचे नाव :— मे. कोणार्क इन्फॉस्ट्रक्चर प्रा.लि.

स्थायी समिती ठराव क्र.४० दि. २२/०१/२०००

कार्यादेश क्र. व दिनांक— ८८१ व दि ०९/०६/२००९

कामाचा कालावधी— १२ महिने मोजमाप नोंदवही क्र. ११६९

प्रथम धावते देयक प्रमाणक क्र.४३५३ दि.२३/१२/२०११ रू.४३,००,०००/—

अंदाजपत्रकीय रक्कम रू. १,७३,६३,९१०/—

निविदा रक्कम रू. २०५२०६६८(+ १८.१८टक्के)

१) उपरोक्त कामाकरीता निविदा मागविले असता तीन निविदा प्राप्त झाल्या असून त्यातील मे. कोणार्क यांची निविदा लघुत्तम असल्याने त्यांची निवड करण्यात आली आहे. परंतू त्यांनी दिलेल्या अंदाजपत्रकीय रकमेच्या + १८.१८ टक्के दराचे विश्लेषण न दिल्याने तो दर योग्य असल्याची खात्री होत नाही.

२) मुळ अंदाजपत्रक व विकास आराखडयानुसार लांबी ३७५ मी.व रूंदी ४५ फुट एवढया मापाचे कॉंक्रिटीकरणाचे काम होणे आवश्यक होते. परंतू मूळ कामात सुधारणा करून लांबी ६७७ मी. व रूंदी ६० फुट एवढे जादा सुधारीत अंदाजपत्रकीय रक्कम रू. ५,२१,०३,५५०/— चे काम करणेची स्थायी

Scan with Fast Scan

समितीची मंजूरी ठराव क्र.१४३ दि. २१/०२/२०११ अन्वये देण्यात आली आहे. सुधारीत जादा काम नवीन निविदा मागवून करणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही झाली नसून मे. कोणार्क यांनाच सदर काम देण्यात आले आहे. तसेच वाढीव कामाचा करारनामा करण्यात आलेला नसून सुधारीत बँक गॅरंटी घेण्यात आली नाही.

३) सदर काम दि. ०९/०६/२०१० पर्यंत पुर्ण होणे आवश्यक असतांना कामास तसेच वाढीव कामाच्या रकमेस वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. परंतू मुळ बँक गॅरंटीची मुदतवाढ करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे.

४) कार्यादेशानंतर १२ महिन्यात काम पुर्ण होणे आवश्यक असतांना लेखापरीक्षण वर्षाचा कालावधी सन २०१२–१३ अखेरपर्यंत काम पुर्ण झालेले नाही.

५) मुळ करारनामा रू. २,०५,२०,६६८/– इतक्या रकमेचा तसेच वाढीव कामाची रक्कम रू.३१५.८३ लक्ष असून रू. १००/– च्या मुंद्रांक पेपरवर करण्यात आला आहे. मे. कोणार्क कंन्स्ट्र. लि. यांचा करारनामा रू. ५१,२००/– च्या मुद्रांक पेपरवर करणे आवश्यक होते. शिल्लक रक्कम रू. ५१,१००/– इतकी रक्कम वसूल करून शासन जमा करणे आवश्यक आहे.

६) टेक्नो कंन्सल्टं यांनी त्यांच्या दि. ३१/१०/२००९ च्या पत्रानुसार सदर रस्त्याच्या कामाचा दर्जा स्टॅंडर्ड स्पेशिफिकेशन नुसार झाले नसल्याचे तसेच टाकण्यात आलेल्या ड्रेनेजला प्लॉस्टर केले नसल्याचे व सिमेंट कॉंक्रिट रस्त्याचे क्युब टेस्टिंग न केल्याचे मे. कोणार्क यांना कळविले असल्याचे नस्तीवरून दिसून

Scan with Fast Scan

येते. त्यामुळे सदर कामाचा दर्जा योग्य नसून निकृष्ट दर्जाचे झाले आहे. याबाबत कोणती कार्यवाही केली याचा खुलासा करावा.

७) उमपा यांचे आवक दि. १०/१/२०११ च्या पत्रान्वये मे.कोणार्क यांनी दि.३१/१२/२०१० पर्यंत कामाची मुदतवाढ मागितली असतांना शहर अभियंता यांनी त्यांचे पत्र क्र. ८८१ दि. ७/२/२०११ अन्वये दि. ३०/०६/२०११ पर्यंत मागणीपेक्षा जास्त कालावधीची मुदतवाढ दिली आहे.

८) मोजमाप पुस्तीका क्र.११६९ व १३१६ लेखापरिक्षणास उपलब्ध झाली नाही.

९) निविदा chapter 2 मधिल ९ नुसार निविदा कालावधी १२० दिवसांचा आहे. निविदा जाहिरात दि. ६/९/२००८ रोजी प्रसिध्द केली असून परंतू कार्यादेश दि.९/०६/२००९ रोजी उशिराने दिले आहे. निविदेतील अटीचा भंग झाला आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

# सार्वजनिक बांधकाम विभाग

परि.क्र.१५

विषय: उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील
१ ते ५ मधील रस्त्यांच्या खड्डे भरणे
या कामातील अनियमितता

2012–13 या वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षण करताना सार्वजनिक बांधकाम विभाग मधील खड्डे भरणे या कामास स्थायी समितीने ठराव क्र. ७४ दि. १०/८/२०१५ नुसार विना निविदा काम करण्यास मंजुरी दिली आहे. त्याची तपासणी केली असता खालील उणीवा निदर्शनास आल्या.

१. खड्डे भरण्याचे काम पुर्वी ७ ठेकेदाराने यशस्वीपणे सदर विभागात केले आहे. त्याचा तपशील नस्तीत नमुद आहे. परंतु त्यामधील मे. जयभारत कन्ट्रक्शन, उल्हासनगर यांनाच कोणतेही कारण नमूद न करता रू. १.९१ कोटीचे काम देण्यात आले आहे. सदर खुलासा करण्यात यावा.

१. रूपये १.९२ कोटी या रक्कमेचे अंदाजपत्रकाचा गोषवारा नस्तीत समाविष्ट आहे. परंतु मोजमापे विवरणपत्र नाही. त्यामुळे महराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९६९ मधील कलम १६५ नुसार जागेवर मोजमापे घेऊन नंतर अंदाजपत्रक बनविणे आवश्यक होते. परंतु तशी कार्यवाही केलेली नाही. तसेच यापुर्वी सदर रस्त्यावर केंव्हा काम केले त्याची नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे अंदाजपत्रक वास्तवादी बनविल्याची खातरजमा करता आली नाही.

२.स्थायी, समिती ठराव क्र. ७४ दि. १०/०८/२०१५ नुसार विना निविदा काम करण्याबाबत ठराव मंजूर केला आहे. महाराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम –१९४९ मधील कलम ५ (२)२ नुसार विशेष कारण नमूद करूनच विना निविदा काम करणे बाबत तरतुद आहे. परंतु तसे कारण नमूद केले नाही.

Scan with Fast Scan

४. कार्यदेश क्र. ३२५१ दि. २/९/२०११ अन्वये खड्डे भरणे या कामासाठी ९ महिने कालावधी दिला आहे. १/६/१२ पर्यंत काम पूर्ण करणे आवश्यक कामाचे साहित्य तपासणी अहवाल व विम्याचा कालावधी पाहता सदर काम दि. २१/३/१२ ते २०/५/१२ या कालावधीत केले आहे. त्यामुळे सदर तातडीची बाब होऊ शकत नाही. त्यामुळे स्थायी समिती ठराव क्र. ७४ दि. १०/८/११ महराष्ट्र महानगरपालिका प्रांतिक अधिनियम–१९४९ मधील कलम ५ (२)२ चे उल्लंघन केले आहे.

५. कामाची मोजमापे कोणत्या कालावधीत आहेत. याबाबत उल्लेख मोजमापपुस्तिकेत नाहीत.

६. कामाचा कालावधी दि. २/९/११ ते १/६/१२ असा असून विमा दि.२१/३/१२ ते २०/५/१२ रू. ४४,९७८/– चा दि. ओरियेंटल insurance कंपनी मर्या. यांचेकडे उतरविला आहे. शासकीय विमा निधीकडे उतरविणे आवश्यक होते. सदर कंपनी बरोबर सह–करार केल्याची कागदपत्रे नाहीत. उर्वरित ७ महिन्याची रक्कम रू. ३,१४,८४६/– वसूल झालेली नाही. खुलासा करावा.

८. नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. जीईएन–१०१८/१३५७/प्र.क्र १६६/९८/नवि–२८ दि. ३/११/२००३ अन्वये कंत्राटी कामगाराचा विमा उतरविणे बंधनकारक आहे. त्याचे पालन झालेले नाही. अंदाजपत्रकाच्या १%विम्याची रक्कम वसूल करणे यावी.

९. कामाची किमंत· १.९१कोटी इतकी असून करारनामा रू. ५०/–च्या दोन मुद्रांक पेपरवर केला आहे. मुद्रांक शुल्क अधिनियम १९५८ मधील कलम ६३ नुसार रू. १८,१००/– हे व्याजासह वसुली करण्यात यावी.

१०. कामांची एकूण खोदाई २९३२.३४घ.मी. असुन वाहतुक ३४२४.५३ घ.मी. केली आहे. सदर परिमाण कसे आले

Scan with Fast Scan

याचा तपशिल नाही. त्यामुळे ४९२.१९ घ.मी. रू. ८२.४७/— प्माणे जादा वहातुकीचे रू. ४०५९१/— प्रदान झाले आहे.

११.कामाची किंमत रू. १.९१ कोटी असून नगर विकास विभाग, मंत्रालय, शासन निर्णय क्र. संकीर्ण २००८/१३३८/प्र.क्र. १७१/०८/नवि—२० दिनांक २/३/२००९ नुसार ५० लाखावरील कामाचे त्रयस्थ संस्थेकडून तांत्रिक लेखा परिक्षण किमान १०% करणे बंधनकारक आहे. त्याचे पालन केलेले नाही. त्यामुळे केलेले प्रदान हे नियमाबाहय आहे. तसेच त्यास स्थायी समिती व महासभा यांची मान्यता घेतल्याचे कागदपत्रे नाहीत. पुर्तता करण्यात यावी.

१२ खडडे भरणे कामामध्ये जेसीबी १७७ तास वापरले आहे. त्याची नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे तपासणी करता येत नाही.

१३.खडडे भरण्याच्या कामात गौणखनिज साहित्य ११९६३.४१ घ.मी. इतके वापरले आहे. परंतु त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री केलेली नाही. अथवा पुरावे नस्तीत जोडले नाहीत. महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग मुंबई याची अधिसुचना दि १५/१/२००३ व शासन परिपत्रक दि ११/०२/२०१० चे पालन केलेले नाही ११९६३.४१×७०६७= ८,४५,४५४/—) सदर तरतुदीचे पालन न करतांच ठेकेदारास प्रदान केल्याने झालेले प्रदान हे नियमबाहय आहे.

१४.डांबर खरेदी,. खडीची बिले तपासणीसाठी मागणी करूनही प्राप्त झाले नाही. राष्ट्रीय नगरपालिका लेखासंहिता यिम क्र. १२.८२(डी) खरेदीची बिले उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे ती प्राप्त झाझी नाही. त्यामुळे लेखापरिणात खात्री करता आली नाही. पुर्तता करावी.

Scan with Fast Scan

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक

उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि.क्र.७६

# सार्वजनिक बांधकाम विभाग

प्रभाग सिनेमा येथील फायर स्टेशनचे काम हे तीन मजूर सहकारी संस्थाकडून करण्यात आलेले आहे. त्या करिता प्रमाणक क्र. ५३० दि. १०/०५/२०१२ अन्वये रू.३७१५५४/– मे. शिलालेख म.का.स.संस्था यांना, प्रमाणक क्र. ५३१ दि. १०/०५/२०१२ अन्वये रू.१०८७५२३/– मे. स्टेन्डरड म.का.स.संस्था व प्रमाणक क्र.९७४ दि. ०५/०६/२०१२ अन्वये रू.१०९०१००/– मे. धनलक्ष्मी म.का.स.संस्था यांना प्रदान केलेल्या आहेत. वरिल कामात खालील अनियमितता दिसून आल्या आहेत.

१) प्रभाग सिनेमा येथील फायर स्टेशनची दुरूस्ती/बांधकाम करणे बाबतचे काम दिवाळीपूर्वी तातडीचे असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) नुसार मंजूर केलेले आहे. व त्यामुळे का.आ.आदेश क्र.३२९३/दि.२२/०९/२०११ अन्वये कामाचे कायदिश मे. धनलक्ष्मी मजुर कामगार संस्थेस जिल्हा उप–निबंधक ठाणे यांची मंजूरी न घेताच देण्यात आलेले आहे. परंतू सदर काम दिनांक २०/३/२०१२ रोजी पूर्ण केलेले आहे. त्यामुळे तातडीची बाब असून देखील कामाचा कालावधी ठेकेदारास १८० दिवस देण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर काम मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २(२) नुसार मंजूर करण्याची निकड समजून येत नाही व सदरहून कलमाचे पालन/अंमलबजावणी झालेली नाही या बाबत खुलासा व्हावा.

२) प्रभाग सिनेमा येथील फायर स्टेशन बांधण्याचे काम विभागणी करून मे. शिलालेख म.का.स.सं., मे. स्टेन्डरड म.का.स.सं व मे. धनलक्ष्मी म.का.स.सं असे तीन संस्थांना विभागून देण्यात आले आहेत. एकाच कामास ३ मजूर सहकारी संस्थेस काम वाटून देण्याचे प्रयोजन काय याबाबत खुलासा व्हावा.

३) प्राकलनातील २६बाबींपैकी २० बाबींच्या प्रमाणात वाढ झालेली दिसून आली आहे. प्राकलन किंमत रू.९,९१,०००/– असताना प्रत्यक्ष खर्च रू.१०,९०,१००/– करण्यात आलेला आहे. त्यामुळे रू.९९,१००/– जास्तीचा खर्च केलेला दिसून येत आहे.

४) अग्निशमन विभागाचा फायर स्टेशन दुरूस्ती/बांधकाम करणे बाबतचा प्रस्ताव/मागणी पत्र नस्तीत समाविष्ट नाही. तसेच केलेले फायर स्टेशन बांधकाम पूर्ण झाले बाबतचे विभागाचे अभिप्राय नस्तीत दिसून आले नाही.

Scan with Fast Scan

५) बांधकाम केलेली फायरस्टेशनची जागा महानगरपालिकेची मालकिची असल्याची नोंद असलेले दस्तऐवज नस्तीत आढळून आलेली नाहीत.

६) काम पूर्ण झालेल्या फायर स्टेशनचे महानगरपालिकेच्या नावे मालमत्तेत नोंद झाल्याबाबतचे अभिलेख नस्तीत आढळून आलेले नाहीत.

७) का.आ.क्र. Umc/PWD/EE ५४ दि. २०/११/२०१२ अन्वये मे. धनलक्ष्मी म.का.स. संस्था यांना कामाचे आदेश देण्यात आलेले आहेत. तथापी सदरहून संस्थेस दिलेल्या कामास जिल्हा निबंधक ठाणे यांचे मंजूरी आदेश घेण्यात आलेले नाहीत.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# सार्वजनिक बांधकाम विभाग

परि.क्र.१७.

नेताजी चौक ते बॅरेक २१०८ व्हाया तहसिलदार ऑफिस रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे व वॅको जंक्शन ते माणेरा जंक्शन रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे कामाच्या नस्तीचे लेखा परिक्षण केले असता उणिवा खालील प्रमाणे निर्दशनास आलेल्या आहेत.

१) कामाचे नाव – नेताजी चौक ते बॅरेक २१०८ व्हाया तहसिलदार ऑफिस रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे.

अंदाजपत्रकीय रक्कम रू.१२३४४७०१/–

तांत्रिक मान्यता क्रमांक व दिनांक ६१६४ दि. १२/०९/२०११

कार्यादेश क्रमांक व दिनांक – ३५०१ दि. ०३/०१/२०१२(+७टक्के)

कामाची मुदत – १५० दिवस

मोजमाप नोंदवही क्रमांक २५०९

प्रथम धावते देयक प्रमाणक क्रमांक १९६५ दि. २३/०८/२०१२

रू.२२७५०००/–

२) कामाचे नाव – वॅको जंक्शन ते माणेरा जंक्शन रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे.

अंदाजपत्रकीय रक्कम रू. २०७०६८००/–

कंत्राटदाराचे नाव– मे. कॉनार्क इन्फास्ट्रक्चर लि.

कार्यादेश क्र. व दिनांक – ३५०१ दि. ०३/०१/२०१२(+७टक्के)

कामाचा कालावधी – १५० दिवस

मोजमाप नोंदवही क्रमांक २७७९

प्रथम धावते देयक प्रमाणक क्रमांक ४०७१ दि. १८/०१/२०१३

रू. ७९२१७५०/–

Scan with Fast Scan

१) कामाची मुदत १५० दिवस असताना लेखा परिक्षण वर्ष अखेरपर्यंत काम पूर्ण झाले नसल्याचे निर्दशनास आले आहे. त्याचप्रमाणे देण्यात आलेल्या मुदतवाढीबाबत स्थायी समितीची मंजूरीचे अभिलेख नस्तीत समाविष्ट नाहीत.

२) अ.क्र. १ च्या कामाबाबत अर्थ सॉईल मधील खोदाईतून ७४४.२५ घ.मी. माती व कठीण मुरूम ३७२.१३ घ.मी. असे एकूण १११६.३८ निघाले असून १२२१.३८ घ.मी.ची खोदाईतून निघालेल्या मालाची वाहतूक केल्याचे मोजमाप नोंदवहीवरून दिसून येते. जादा वाहतूक केलेल्या १०५ घ.मी.ची रू.८२.४७/– प्रती घ.मी. प्रमाणे एकूण रूपये ८६५९/– इतक्या रकमेचे ठेकेदारास जादा प्रदान झाले आहे.

३) विशेष अटी व शर्तीमधील क. ७ नुसार डांबरीकरण केलेल्या कामाचा डिफेक्ट लायबीलीटी कालावधी ३ वर्षाचा आहे. शहर अभियंता यांचे पत्र क्र.३११ दि. २३/०७/२०१३,१००० दि. २८/१०/२०१४ व १७५ दि.२९/१२/२०१४ अन्वये काम केलेल्या रस्त्यामध्ये काही ठिकाणी खड्डे पडले असल्याने शहर अभियंता यांनी प्रत्यक्ष पाहणी केले असता निदर्शनास आले असल्याच नमूद आहे. त्यामुळे काम गुणवत्तापुर्वक झालेले नाही. गुणवत्तापुर्वक तपासणीचे अहवाल नाहीत. तसेच नगरविकास विभाग, शासन निर्णय दि.०२/०३/२००९ नुसार त्रयस्थ् पार्टीकडून कामाची तपासणी करणे आवश्यक असतांना त्याचे पालन झालेले नाही.

४) कामामध्ये गौणखनिज साहीत्याचे अ.क्र.१च्या कामाकरीता ५५८.१९ घ.मी. व अ.क्र.२ च्या कामाकरीता २२.३४घ.मीर. इतके परिमाण वापरले आहे. सदर बाबींचे दर निश्चीत करताना बेसीक रेट मध्ये रॉयल्टी समाविष्ट केलेली आहे. त्यामुळे महसूल व वनविभाग यांची अधिसुचना दि. १०/२/२००३ व शा.नि.क्र. गौण खनिज/१०/१००९/सी.आर/३०९/ख दि. ११/११/२०१० अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी व मुरूम,इ. गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) ची रक्कम रूपये ७०.६७ प्रती घ.मी. दाराने अनुक्रमे रू. ३९४४७/– व १५७९/– इतकी रक्कम शासन खाती भरणे बंधनकारक आहे. याची

Scan with Fast Scan

खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही अथवा पुरावे सादर केलेले नाहीत. त्यामुळे ठेकेदारास केलेले प्रदान हे नियमबाहय आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि.क्र.१८

# सार्वजनिक बांधकाम विभाग

विषय:— बांधकाम विभागातील प्रभाग क्र. ५६ मधील शिवमार्ग परिसरात एम.२५० रोड बांधणे, पायवाट व नाल्या बांधणे, पेव्हर ब्लॉक बसविणे, कामातील अनियमितता बाबत.

ठेकेदाराचे नाव — मे.चंदा मजूर का.स.संस्था

डि.डि.आर.काम वाटप आदेश क्र.: १०१२ दि. ०९/०७/२०१०

कामाचा कार्यादेश : २०८४ दि. १२/०७/२०१०

कामाचा कालावधी — ९० दिवस

काम पूर्ण झाल्याची तारीख : १६/०३/२०११

प्रमाणक क्र. ४९३९ दि. २०/०३/२०१३ रू. ४४००००/— तपासले असता त्यात खालीलप्रमाणे अनियमीतता आढळून आलेल्या आहेत.

१) वरील ठेकेदारास दिलेले काम हे विहीत मुदतीत (दि.११/१०/२०१०पर्यंत)झालेले नाही. तसेच कामाची मुदत वाढ मिळणे बाबतचा ठेकेदाराचा अर्ज सादर न करताच कामाची मुदतवाढ दि. १६/०३/२०११ पर्यंत दिलेली आहे. मुदतवाढी बाबतचे सबळ कारण व पुरावे नस्तीत दाखल केलेले नाहीत. करारनाम्यातील अटि व शर्ति नुसार विलंब कालावधीबाबत दंडात्मक कार्यवाही केल्याचे दिसून आले नाही.

२) ठेकेदाराचे देयकात काम उशिराने केले बाबतची नोंद घेतलेली नाही.

३) एम.बी.क्र.३२५२ अधिकाऱ्याचे नाव नमुद नाही. एम.बी.नोंद सुरूवात केल्याची दिनांक व काम संपण्याची दिनांक नमुद नाही.

४) सदर कामाची प्राकलन रक्कम रू. ३९९९३७/— असून एकूण कामाचा खर्च रूपये ४४००००/— म्हणजेच १०टक्के वाढ करून देण्यात आलेला आहे. परंतु रक्कम वाढी बाबतची सबळ कारणे नस्तीत नमूद नाहीत.

५) कामाचा कार्यादेश व खर्चाची तरतूद २०१०—११ मधील आहे. तथापी प्रत्यक्ष प्रदान हे २०१२—१३ च्या तरतूदीतुन केलेली आहे. स्पील ओव्हर कामासाठी तरतूद अर्थ संकल्पामध्ये समाविष्ठ नाही.

Scan with Fast Scan

६) काम केल्यापूर्वीचे व काम झाल्यानंतर संबधीत कामाचे फोटो काढलेले नाहीत.

७) कामात गौणखनिज साहित्य १६७.४९ घ.मि. इतके वापरले आहे. परंतु त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री केलेली नाही. अथवा पुरावे नस्तीत जोडले नाहीत. महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांची अधिसुचना १५/०१/२००३ व शासन परिपत्रक दि. ११/०२/२०१० चे पालन केलेले नाही.(१६७.४९ *७०६७= ११८३६.५१) सदर तरतुदीचे पालन न करता ठेकेदारास देयक प्रदान केलेले आहे. हे नियम बाहय आहे.

८) प्रदान देयकातील मोजमाप पुस्तकातील बाबींची तपासणी केली असता काही बाबींचे दर हे २००८–२००९ च्या दरसुचिपेक्षा जास्तीचे लावलेले दिसून येत आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे. तसेच तक्त्यात दर्शविलेली रक्कम रू. ३८६२६/– ठेकेदारास ज्यादा प्रदान झालेले आहे.

## तक्ता

| अ. क्र. | बाब व तपशिल | जिल्हा दर सूची दर | प्रदान दर | परिमाण | प्रदान रक्कम | देय रक्कम रू. | अतिप्रदान रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | १.३.६पी.पी.सी बेडिंग पाया | २९२८ घ.मी. | ३३९७ घ.मी | ३१.०३ | १०५४०९ | ९०८५६ | १४५५३ |
| २ | पी.पी.सी. एम–१० गटरवाल मेटल | २९२८ घ.मी | ३४६४.९५ घ.मी | २४.४४ | ८४६८३ | ७१५६० | १३१२३ |
| ३ | पी.एल. WBM Road layrs 75/100mm | ६८२ | ७९४.८० | ६३.२१ | ५०२३९ | ४३१०९ | ७१३० |
| ४ | पी./6 mm Cement plaster | ६६ | ९१.८० | १४८.०६ | १३५९२ | ९७७२ | ३८२० |
| | | | | | | एकुण | ३८६२६ |

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

# सार्वजनिक बांधकाम विभाग

परि. क्र. १९

विषय:— उल्हासनगर मनपा अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आलेल्या कामांतील सर्वसाधारण अनियमितता.

उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागातील खालील कामांचे लेखा परिक्षण केले असता खालील प्रमाणे सर्वसाधारण अनियमितता निदर्शनास आलेल्या आहेत.

- उल्हासनगर क.३ हिराघाट ते मिनिस्टर कॉम्प्लेक्स ते समर्पन अपार्ट पर्यंत रस्ता रूंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे.
- उल्हासनगर क.३ राधास्वामी सत्संग हॉल ते साईबाबा मंदिर पर्यंत रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे.
- उल्हासनगर १ ते ५ मधील मनपा चौक ते काटकेश्वर मंदिर व्हाया सी ब्लॉक चौक रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे.
- उल्हासनगर क.५ दुधनाका ते गणेशनगर पर्यत रस्ता रूंदीकरण, सिमेंट कॉंक्रिटीकरण व नाला बांधण्याचे काम करणे.
- उल्हासनगर क. ४ ओ.टि. सेक्शन ते श्रीराम चौक पेट्रोलपंप पर्यत रस्तारूंदीकरण, सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे.
- साई बाबा चौक ते मुरबाड रोड व्हाया धोबी घाट मंडळ रस्त्याचे कॉंक्रिटीकरण करणे.
- वॅको जंक्शन ते मानेरा जंक्शन रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे.
- नेताजी चौक ते बॅरेक २१०८ व्हाया तहसिलदार ऑफिस रस्त्याचे पुर्नपृष्ठांकन करणे.

१) निविदा जाहिरात ज्या वर्तमानपत्रात देण्यात आली होती, त्या वर्तमानपत्राची प्रत लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही.

२) स्कोप ऑफ वर्क मधील २.२.२० व सर्वसाधारण सुचना क. ३.१.२ नुसार महानगरपालिकेने प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. याबाबत अभिलेख नस्तीत जोडलेले नाहीत.

३) सर्वसाधारण अटी व शर्तीमधील १.२ नुसार रस्त्याचे कामाचे पर्यवेक्षण शहर यंता व प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार यांनी करणे आवश्यक आहे. परंतू पर्यवेक्षणाचे अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

४) सर्वसाधारण अटी व शर्तीमधील १.२ व २.७ नुसार कामाच्या मोजमापाची नोंद उमपाचा प्रतिनिधी प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार यांनी कंत्राटदाराच्या उपस्थितीत मोजमाप पुस्तकेवर नोंदविणे आवश्यक आहे. परंतु उपलब्ध झालेल्या मोजमाप

Scan with Fast Scan

नोंदवहीवर अशा प्रकारे संयुक्तीकरित्या नोंदी झाल्या नसल्याच निर्दशनास आले आहे.

५) सर्वसाधारण अटी व शर्तीमधील २.४ नुसार कायदिशानंतर करण्यात येणाऱ्या कामाची प्रगतीसुची (प्रोग्रेस शेडयुल) शहर अभियंता यांना सादर करणे आवश्यक असताना सदर अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध झाला नाही.

६) निविदेतील सर्वसाधारण अटी व शर्ती क. २.१० नुसार कामाकरिता वापरण्यात आलेल्या सर्व साहित्याची मंजुरी कामात वापर करणेपुर्वी शहर अभियंता, उमपा व उल्हासनगर मनपाने नेमणूक केलेले प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार यांची घेणे आवश्यक आहे. अशा मंजूरीचे अभिलेख लेखा परिक्षणास उपलब्ध झाले नाहीत.

७) विशेष अटी व शर्तीमधील क. १३ नुसार कंत्राटदाराने बिल सादर करतांना त्याने नोंदविलेल्या कामाचे मोजमापे साहित्याच्या चाचणी अहवालासह सादर करणे आवश्यक असताना त्याचे पालन झाले नाही.

८) विशेष सुचनामधील क.३नुसार कंत्राटदाराने वापरलेल्या साहित्याचा व कामाचा चाचणी अहवाल शहर अभियंता व प्रोजेक्ट मॅनेजमेंट सल्लागार याचे स्वाक्षरीसह ठेवणे आवश्यक आहे. परंतू सदर अहवाल लेखापरिक्षणास अप्राप्त आहे.

९) नगरविकास विभाग, शासन निर्णय क.संकीर्ण—२००८/१३३८/प्रक.१७१/ नवि२० दि.०२/०३/२००९ अन्वये कामाचे त्रयस्थ पार्टीकडून लेखापरिक्षण केल्याचे दिसून आले नाही.

१०) विशष अटी व शर्ती क्र.६ नूसार कंत्राटदाराने साहित्यांचा चाचणी परिक्षण अहवाल नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. सदर नोंदवही लेखापरिक्षण उपलब्ध झाली नाही.

११) तांत्रिक स्पेशिफिकेशन मधील १४.६.२ नूसार कंत्राटदाराने त्याच्या नियोजित कामाचा कार्यक्रम अहवाल महानगरपालिकेस सादर करणे आवश्यक आहे. त्याचे पालन झालेले नाही.

१२) काम सुरू करणेपूर्वी कामाच्या जागेवर घेण्यात आलेला स्थळ पाहणी अहवाल लेखा परिक्षणास अप्राप्त आहे. राष्ट्रीय नगरपालिका लेखा संहिता मधील १२.८२ डि नुसार देयका सोबत वापरलेले डांबर, असलफाल्ट सिमेंट, वाळू, खडी, स्टील, कॉंक्रिट यांच्या खरेदी पावत्या व वाहतुक पास इ. देयकांसोबत जोडणे आवश्यक आहे. परंतु त्याचे पालन झालेले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि. क्र. २०

# सार्वजनिक बांधकाम विभाग

**विषय:— उल्हासनगर क्र.३ हिराघाट ते मिनिस्टर कॉम्प्लेक्स ते समर्पन अपार्ट. पर्यत रस्ता रूंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे कामातील अनियमितता.**

उल्हासनगर महानगरपालिकेचे सन २०१२—१३ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण स्थानिक निधी लेखापरिक्षण विभागामार्फत दि. २७/०२/२०१५ पासून हाती घेण्यात आले आहे. उल्हासनगर क्र.३ हिराघाट ते मिनिस्टर कॉम्प्लेक्स ते समर्पन अपार्ट. पर्यत रस्ता रूंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे कामाच्या नस्तीचे लेखा परिक्षण केले असता उणिवा खालीलप्रमाणे निदर्शनास आलेल्या आहेत.

कामाचे नाव — मुलभूत सुविधा विकास योजनेअंतर्गत उल्हासनगर क्र.३ हिराघाट ते मिनिस्टर कॉम्प्लेक्स ते समर्पन अपार्ट. पर्यत रस्ता रूंदीकरण व सिमेंट कॉंक्रिटीकरण करणे.

अंदाजपत्रकिय रक्कम रू. १६२३४०५०/—

कंत्राटदाराचे नाव — मे. कोणार्क इन्फॉस्ट्रक्चर लि.

कार्यादेश क्र. व दिनांक — ८८० दि. २५/०३/२०१०

कामाचा कालावधी — ८ महिने मोजमाप नोंदवही क्र. २२०२.

प्रथम धावते देयक — रू. ४१६९८००/—

दुसरे धावते देयक — रू. ७२४९९८८/—

तिसरे धावते देयक,प्रमाणक क्र.२६२९ दि. ०८/१०/२०१२ रू. २३०००००/—

१) अंदाजपत्रकीय रक्कम रू. १६२३४०५०/— ची तांत्रिक मंजूरी लेखा परिक्षणास उपलब्ध झाली नाही.

२) मुळ प्राकलनानुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. १६२३४०५०/— निश्चित केली आहे. व त्या अनुषंगाने निवीदा कार्यवाही पुर्ण झाली असताना शहर अभियंता यांनी तांत्रिक मंजुरी क्र. १७०८ दि. २३/०७/२००८ नुसार सदर कामास रू. २४३८५०००/— इतक्या अंदाजपत्रकीय रक्कमेस सुधारित मंजूरी देण्यामागील कारणमीमांसा लेखा परिक्षणास स्पष्ट झालेली नाही.

३) सुधारित अंदाजपत्रकीय रक्कम रू. २४३८५०००/— एवढी असून वाढीव रक्कम ५३७४९२७/— चा करारनामा करण्यात आलेला नाही.

४) मान्य निविदा रू. १९०१००७३/— व सुधारित वाढीव काम रू. ५३७४९२७/— असे एकूण रू. २४३८५०००/— इतक्या रक्कमेच्या कार्य कंत्राट रक्कमेचा मुद्राक शुल्क अधिनियम १९५८ मधील कलम ६३ नुसार रू. २३५००/— इतक्या रक्कमेचा करारनामा करणे आवश्यक होते. परंतु रू. १००च्या मुद्रांक पेपरवर करारनामा केला आहे. त्यामुळे शासनाचे मुद्रांक शुल्क रू. २३४००/— चे नुकसान झाले आहे.

Scan with Fast Scan

५) वित्तविभाग शा.नि. विकास/ १०९८/प्र.क्र.२९/९८/शासन हमी दि. १९/०८/१९९८ नुसार कामाचा व कामगारांचा विमा रक्कम रू. १२१२१५/— देयकातून कपात करण्यात आली नाही.

६) कार्यदिशानंतर ८ महिन्यात काम पूर्ण होणे आवश्यक असताना लेखा परिक्षण वर्ष अखेर पर्यत काम पूर्ण झालेले नाही. तसेच कामास मुदत वाढ देण्यात आले बाबत अभिलेख नस्तीत उपलब्ध झाले नाही. मुदत वाढ मंजूरी आदेश नसताना रक्कम प्रदान करणे नियमाबाहय आहे.

७) निविदा CHAPTER ii मधील ९ नुसार निविदा कालावधी १२० दिवसाचा आहे. निवीदा जाहिरात दि. ०६/०९/२००८ रोजी प्रसिध्द केली असून परंतू कार्यदेश दि. २५/०३/२०१० रोजी उशिराने दिले आहे. निवीदेतील अटिचे पालन झालेले नाही.

८) मे. कोनार्क इफॉस्ट्रक्चर यांची निवीदा १७.१० टक्के अधिक निवड करण्यात आली आहे. अधिक १७.१० टक्के दर योग्य असले बाबत दराचे विश्लेषण लेखा परिक्षणाकरिता अप्राप्त आहे.

९) विभागीय,आयुक्तकोकण विभाग यांचे आदेश क्र.साशा/का—३/नपा—७/मुभूसोसू/उल्हास मनपा/३०२८/०९ दि. २३/०३/२०१० मधील अट कमांक ८ नुसार काम सुरू करण्यापुर्वी व पुर्ण झाल्यानंतर कामाचे फोटो काढणे आवश्यक आहे. सदर फोटो नस्तीत आढळून आले नाहीत.

१०) सुरक्षा ठेव रक्कम रू. ३२४७००/— च्या बँक गॅरंटीची मुळ प्रत तपासणी करता उपलब्ध नाही.

११) विशेष अटी व शर्तीमधील क्र. ०७ नुसार सिमेंट कॉंक्रिटीकरण केलेल्या कामाचा डिफेक्ट लायबिलीटी कालावधी ५ वर्षाचा आहे. कार्य. अभियंता, उमपा यांचे पत्र क्र. १२३१ दि. २२/०३/२०१२ अन्वये काम केलेल्या रस्त्यामध्ये काही ठिकाणी तडे गेले असल्याने ते दुरूस्ती करण्याचे कळविले होते. त्यामुळे काम गुणवत्ता पूर्वक झाल्याची खात्री होत नाही.

१२) प्रथम धावते देयकेनुसार ड्रेनेज करीता डांबर रस्त्यांवरील खोदाई १५८.६ मी. लांब व Earth soil मधील खोदाई १४१.६ मी. लांब करण्यात आली आहे. दोनही खोदाईचे परिमाण एकच असणे आवश्यक होते. विसंगतीबाबत खुलासा करावा.

१३) दुसरे धावते देयकाच्या मोजमाप नोंदवहीमधील पृ.क्र.२२ व२३ वरिल नोंदीनुसार १२४.३५ मी. लांबीची बीटी सरफेस मधील खोदाई ८११.८३ घ.मी. व Earth soil मधील खोदाई ४०५.९३ घ.मी. करण्यात आली आहे. परंतु खोदाई नंतर सदर जागेवर पुढील कोणतेही काम करण्यात आले नसल्याचे मोजमाप पुस्तीकेवरून निदर्शनास येते. त्यामुळे अनुक्रमे रक्कम रू. १८८३८५/— व रू. ४६०३२/— अनावश्यक प्रदान करण्यात आली आहे.

१४) दुसरे धावते देयकाच्या मोजमाप नोंदवहीमधील नोंदीनुसार कठिण मुरमात खोदाई १३४५.०९ घ.मी. असताना १३७३.१० घ.मी. चे प्रदान केल्याने ३२.०१ घ.मी. ची रू. ११३.४० प्रति घ.मी. प्रमाणे रक्कम रू. ३१७७/— चे अति प्रदान झाले आहे.

Scan with Fast Scan

१५) Providing Dry Trap rubble stone 15 to 20 cm करीता जिल्हादर सुची २००७—०८ मधील दर रू. ४०७ /— अधिक महानगरपालिका ५टक्के रू. २०.३५/— प्रमाणे रू. ४२७.३५ इतकी रक्कम अदा करणे आवश्यक असताना रू. ४५३.१३/— रक्कम अदा केल्याने १०२९ घ.मी. करीता रू. २६५२७ इतकी ज्यादा रक्कम अदा करण्यात आली आहे.

१६) बांधकाम करण्यात येणाऱ्या सिमेंट रस्त्याच्या खालून ड्रेनेज लाइन टाकण्याचे काम मुळ अंदाज पत्रकाम समाविष्ट नसताना सदर काम करण्यात आल्याचे मोजमाप पुस्तीकेवरून दिसून येते. सदर ज्यादा कामास तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात आली नाही.

१७) कामामध्ये गौण खनिज साहित्याचे २६९०.४९ घ.मी. इतके परिमाण वापरले आहे. सदर बाबीचे दर निश्चीत करताना बेसीक रेट मध्ये रॉयल्टी समाविष्ट केलेली आहे. त्यामुळे महसूल व वनविभाग यांची अधिसूचना दि. १०/०२/२००३ व शा.नि.क्र.गौण खनिज/१०/१००९/सीआर/३०९/ख दि ११/०२/२०१० अन्वये ठेकेदाराने बांधकामासाठी वापरलेली वाळू, खडी, व मुरूम इ. गौण खनिजांचे स्वामित्व धन (रॉयल्टी) ची रक्कम रू. ७०.६७ प्रति घ.मी.दराने रू. १९०१३७/शासन खाती भरणे बांधनकारक आहे. याची खातरजमा महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही. अथवा पुरावे सादर केलेले नाहीत त्यामुळे ठेकेदारास केलेले प्रदान हे नियमबाहय आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

# सार्वजनिक बांधकाम विभाग

परि. क्र. २१

**विषय:– आमदार विकास निधी अंतर्गत कॅम्प क्र.३ येथील रॉयल एमरोल्ड बिल्डींग ते पारस रेसिडेन्सी पर्यंत नाली व रस्ता तयार करणे कामातील अनियमितता बाबत.**

सन २०१२–१३ साठी आमदाराच्या स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत उल्हासनगर म.न.पा हद्दीतील कॅम्प क्र.३ येथील रॉयल एमरोल्ड बिल्डींग ते पारस रेसिडेन्सी पर्यंत नाली व रस्ता तयार करण्याचे काम करण्यात आलेले आहे. सदरहू कामाकरिता मे. आदर्श मजूर का.स.संस्था यांना प्रमाणक क्रमांक ४६/४४ दि. १/०३/२०१३ अन्वये रू. ९९९४२७/– प्रदान करण्यात आलेले आहेत. सदरहू कामात अनियमितता दिसून आल्या आहेत.

१) जिल्हाअधिकारी यांचे प्रशासकीय मान्यता आदेशातील अट क्र. ५ नुसार आमदार विकास निधी कार्यक्रमा अंतर्गत घेण्यात येणारे बांधकाम महानगरपालिकेच्या मालकीच्या जागेतच घेता येईल असे नमुद आहे. खाजगी संस्थेच्या जागेवर घेता येणार नाही. बांधकाम केलेली रस्त्यांची जागा महानगरपालिकेच्या मालकीची असल्याचे कागदपत्रे नस्तीत समाविष्ठ नाहीत.

२) कार्यादेश क्र. ८१ दि. २४/०१/२०१३ अन्वये वरिल संस्थेस काम दिलेले आहे. व ते २७/०२/२०१३ रोजी पूर्ण झालेले आहे. तथापी कामाचा विमा दि. १४/०२/२०१३ रोजी उशीराने उतरविलेला आहे. विम्याचा कालावधी नमूद नाही. फक्त विमा पावती जोडलेली आहे. वित्त विभाग शासन निर्णय क्र.जिइ. एन/११९८/१३५६/प्रक्र./१६६/८/नवी– २४/दि. ३/११/२००३ अन्वये ठेकेदाराच्या देयकातून १ टक्के विमा निधी रू. ९९९४/– वसूल करणे आवश्यक आहे.

३) बांधकाम केलेल्या रस्त्याची महानगरपालिकेच्या मालमत्ता नोंदवहीत नोंद झाल्याबाबतची नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध करण्यात आलेली नाही.

४) बांधकामात गौण खनिज साहित्य ४२३.८६ घ.मी. इतके वापरले आहे. परंतू त्याची रॉयल्टी भरल्याची खात्री केलेली नाही. अथवा पुरावे नस्तीत जोडले नाहीत. महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग मुंबई यांची अधिसुचना दि. १५/०१/२००३ व शासन परिपत्रक दि. ११/०२/२०१० चे पालन केलेले नाही. (४२३.८६x७०.६७=२९९५४/–) सदर तरतुदीचे पालन न करताच ठेकेदारास प्रदान केल्याने झालेले प्रदान हे नियमबाहय आहे.

५) जिल्हाधिकारी ठाणे यांचे प्रशासकिय मान्यता आदेश दि. ३१/१२/२०१२ अट क्र. ६ नुसार प्रशासकिय मंजूरी दिलेल्या कामामध्ये अपरिहार्य तांत्रिक बदल/जागेमधील बदलास वेळीच मान्यता घेणे बंधनकारक आहे. त्यामध्ये फेरबदल करता येणार नाही असे नमूद आहे. तथापि वरल प्रकरणात जादा परिमाणाचा वापर केला असून

त्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभाग नियमावली मधिल क्र. २२७ नुसार कार्यकारी अभियंता यांची पूर्व परवानगी घेऊन तद्नंतर जादा काम करणे आवश्यक आहे. त्याचे पालन केलेले नाही.

**VARIATION STATEMENT**

As Estimated as Executed

| S.N. | Discripition of item | Unit | Qty | Rate | Amt | Qty | Amt | Diff |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Excav Found Soft Murum | cmt | 101 | 99.75 | 10075 | 190.20 | 18973 | 8898 |
| 2 | P/L WBM Road Layers of 75/100mm | cmt | 71-25 | 907.40 | 64652 | 189.34 | 171807 | 107155 |
| 3 | P/L tackcoat with bitu men 0.5 kg | cmt | 950 | 24.47 | 23246 | 1885.88 | 46147 | 22901 |
| | एकूण बदल केलेल्या बाबींची रक्कम | | | | | | | 138954 |

६) रस्त्यांच्या डांबरीकरण कामामध्ये बी.एम व ए.सी.चा वापर केलेला आहे. कामाचा कालावधी दि. २४/०१/२०१३ ते २७/०२/२०१३ असा आहे. परंतू सदर कामासाठी बी.एम व ए.सी. हे जय भारत कंन्स्ट्रक्शन यांचे कडून आणल्याची चलने जोडली आहेत. ती तपासली असता सदर चलने हे दिनांक ०४/०६/२०१२ ते २७/०६/२०१२ या कालावधीच्या आहेत व त्यामुळे प्रस्तूत काम हे गुणवत्तापुर्ण झाल्याचे लेखापरिक्षणात दिसून आले नाही. तसेच काम सुरू असताना जागेवर तपासणी व काम पूर्ण झाल्यावर गुणवत्ता पुर्ण चाचणी घेतलेली नाही. त्यामुळे सदर रक्कम रू. ८६९७८५/— हा खर्च निष्फळ ठरतो. साधार खुलासा करावा.

<u>बी.एम व ए.सी.चा वापर केल्याचा तक्ता</u>

| S.N. | Discripition of item | Unit | Qty | Rate | Amt |
|---|---|---|---|---|---|
| 1 | P/L WBM Road Layers of 75/100mm | cmt | 189.34 | 907.40 | 171807 |
| 2 | P/L Leveled Bitumen macadam on Road Surface of 2 % of wt. | cmt | 60.95 | 4608.14 | 280866 |
| 3 | P/L Bitumen macadam withitumen 3.3% of wt. | cmt | 47.50 | 4767.81 | 226470 |
| 4 | P/L Asphaltic concrete with bitumen 5.75%wt. | | 23.32 | 8175 | 190641 |
| | | | | Total | 869785 |

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

# उल्हासनगर महानगरपालिका

परि.क्र.२२

## पाणी पुरवठा विभाग

विषय :—पाणी पुरवठा वसूल रकमांतील अनियमितता बाबत.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या सन 2012-13 या वर्षाच्या लेखा परिक्षणाच्या वेळी निवडक महिन्याच्या पाणी पट्टी वसुलीच्या पावत्यांची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आल्या.

1) प्रत्यक्ष वसूल रकमेपेक्षा कमी प्रमाणात भरणा झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपषिल खालील प्रमाणे आहे. त्याची वसुली व्याजासह होणे आवश्यक आहे.

| पावती कमांक व भरणा दिनांक | वसूल केलेली रक्कम | जमा केलेली रक्कम | कमी जमा केलेली रक्कम |
|---|---|---|---|
| 2520 ते 2537 दिनांक 3/12/12 | 55699 | 54448 | 1251 |
| 2538 ते 2545 दिनांक 5/2/13 | 30822 | 28716 | 2106 |
| 3600 दिनांक 6/2/2013 | 1674 | — | 1674 |
| 3723 ते 3729 दिनांक 2/4/13 | 29484 | 24390 | 5094 |
| | एकूण रक्कम | | 10125 |

Scan with Fast Scan

2) एकत्रित वसुलीच्या नोंदवहीत धनादेशाव्दारे प्राप्त होणा–या रकमा त्यासोबत दर्शविलेल्या पावत्या रकमांमध्ये खालील प्रमाणे तफावत असल्याचे निदर्शनास आले.

| पावती क्र. | वसूल दिनांक | रोखवहीत जमा दिनांक | रोखवहीत नोंद घेतलेली रक्कम | पवतीनुसार जमा रक्कम | तफावत रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 4952 ते 4980 | 15/2/13 ते 13/3/13 | 18/3/13 | 826965 | 755264 | 71701 |
| 4981 ते 5000 | 16/3/13 ते 30/3/13 | 30/3/13 | 292531 | 242529 | 50002 |

3) महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2011 मधील नियम 90 प्रमाणे वसूल करण्यात आलेल्या रक्कमा रोजच्या रोज भरणा करणे आवश्यक आहे. तथापि खालील नमूद केलेल्या पावत्यांची रक्कम विलंबाने भरणा केल्या आहेत. त्यामूळे सदर रक्कम लेखांच्या बाहेर राहिल्याने वित्तीय अनियमितता झाली आहे. साधार खुलासा करण्यात यावा.

4) पावती क्र. 2509 ते 2525 रक्कम रुपये 51515 या पावत्यामध्ये वसुली दिनांकात खाडाखोड व उपरीलेखन केल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच पावत्यावरील दिनांक क्रमवारीने असणे आवश्यक आहे. तथापि पावती क्रमांक 2526 दिनांक 12/11/2012 रोजीची असून या पावतीच्या अगोदरच्या पावत्यांच्या दिनांकात खाडाखोड करुन दिनांक बदलण्यात आला आहे. उदा. पावती क्रमांक 2523 व 2525 दिनांक 19/11/2012 पावती क्रमांक 2518 व 2519 दिनांक 15/11/2012.

मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि क्र.२३

## पाणी पुरवठा विभाग

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, उमपा, यांनी कार्यादेश क्र. ५१/१२ दि. १६/०५/२०१२ अन्वये पावसाळयापूर्वी पोक्लेने व जेसीबी मशीनव्दारे नाल्यांची सफाई करणे व निघालेला कचरा यांची डपींग ग्राउंडवर वाहतुक करणे हे रू. ३,७८,०९२/– अंदाज पत्रकीय किंमतीचे काम ९ टक्के वाढीव दराने मे.व्ही.आर. पनवेलकर अंबरनाथ यांना देण्यात आले होते.

या कामाच्या संबंधी कागदपत्राची तपासणी केली असता पोक्लेने व जेसीबी व्दारे कचरा काढणे व वाहतुक करणे याच्या परिमाणाची नोंद पी. डब्ल्यू.डी. मॅन्युअल १९८४ मधिल परि–२४ नुसार मोजमाप पुस्तकामध्ये घेणे आवश्यक असतानाही, सदर कामाच्या परिमाणाची नोंद मोजमाप पुस्तकामध्ये (MB) घेण्यात आली नसल्याने अनियमितता झाल्याने निर्देशनास येते.

तसेच देयकामधून उपकराची रक्कम रूपये ४१,२१२/– दि. १७/०६/२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे वसुल केलेली नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि क्र.२४

# पाणी पुरवठा विभाग

**विषय:– टँकरने पाणीपुरवठा करणे या कामामधील अनियमिततेबाबत.**

१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील नागरीकांना पाणीपुरवठा टँकरने करण्यासाठी निविदा मागवून मे. हरदीप रोडवेज कल्याण यांना स्थायी समिती ठराव क्र.५५ दिनांक २८/०८/२००८ नुसार मंजूरी प्राप्त झाल्यानंतर कामाचे आदेश क्र .UMC/WSSD/EE/2961 दिनांक १८/९/२००८ नुसार कामाचा कालावधी ०६ महिने एवढया कालावधीसाठी देण्यात आले आहे. संबधित कंत्राटदारास २०१२–१३ या आर्थिक वर्षामध्ये रकमा देण्यात आलेल्या रकमांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | रोख प्रमांक क्रमांक व दिनांक | धनादेश क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ८८५ दि.२९/०५/२०१२ | ८९६८९२ दि.२९/०५/२०१२ | ७२१३५४ |
| २ | २४३४ दि.२५/०९/२०१२ | १३५७७ दि.२५/०९/२०१२ | ६८९९९० |
| ३ | ३१६४ दि.१७/११/२०१२ | ११३२८० दि.१७/११/२०१२ | ४९९२०० |
| ४ | ३२०८ दि.२२/११/२०१२ | ११३४१२ दि.२२/११/२०१२ | ५००१६० |
| ५ | ३४३० दि.६/१२/२०१२ | ११३५७३ दि.६/१२/२०१२ | ५२११७२ |
| ६ | ३६९१ दि.२६/१२/२०१२ | ११३१५२ दि.२६/१२/२०१२ | ३४५२६२ |
| ७ | ३६९२ दि.२६/१२/२०१२ | ११३१५३ दि.२६/१२/२०१२ | ३३४७१६ |
| ८ | ३८२९ दि.३/१/२०१२ | ११३२३३ दि.३/१/२०१२ | २९५५४४ |
| ९ | ४१०१ दि.१८/१/२०१३ | १२००८७ दि.१८/१/२०१३ | ७७८३३० |

Scan with Fast Scan

परि क्र.२४

# पाणी पुरवठा विभाग

विषय:– टॅकरने पाणीपुरवठा करणे या कामामधील अनियमिततेबाबत.

१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील नागरीकांना पाणीपुरवठा टॅकरने करण्यासाठी निविदा मागवून मे. हरदीप रोडवेज कल्याण यानां स्थायी समिती ठराव क्र.५५ दिनांक २८/०८/२००८ नुसार मंजूरी प्राप्त झाल्यानंतर कामाचे आदेश क्र .UMC/WSSD/EE/2961 दिनांक १८/१/२००८ नुसार कामाचा कालावधी ०६ महिने एवढया कालावधीसाठी देण्यात आले आहे. संबधित कंत्राटदारास २०१२–१३ या आर्थिक वर्षामध्ये रकमा देण्यात आलेल्या रकमांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | रोख प्रमांक क्रमांक व दिनांक | धनादेश क्रमांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ८८५ दि.२९/०५/२०१२ | ८९६८९२ दि.२९/०५/२०१२ | ७२१३५४ |
| २ | २४३४ दि.२५/०९/२०१२ | १३५७७ दि.२५/०९/२०१२ | ६८९९१० |
| ३ | ३१६४ दि.१७/११/२०१२ | ९१३२८० दि.१७/११/२०१२ | ४९९२०० |
| ४ | ३२०८ दि.२२/११/२०१२ | ९१३४९२ दि.२२/११/२०१२ | ५००१६० |
| ५ | ३४३० दि.६/१२/२०१२ | ९१३५७३ दि.६/१२/२०१२ | ५२९१७२ |
| ६ | ३६९१ दि.२६/१२/२०१२ | ९१३१५२ दि.२६/१२/२०१२ | ३४५२६२ |
| ७ | ३६९२ दि.२६/१२/२०१२ | ९१३१५३ दि.२६/१२/२०१२ | ३३४७१६ |
| ८ | ३८२९ दि.३/१/२०१२ | ९१३२३३ दि.३/१/२०१२ | २९५५४४ |
| ९ | ४१०१ दि.१८/१/२०१३ | ९२००८७ दि.१८/१/२०१३ | ७७८३३० |

Scan with Fast Scan

| | | | |
|---|---|---|---|
| १० | ४१०२ दि.१८/१/२०१३ | ९२००८८ दि.१८/१/२०१३ | ४८१८५२ |
| ११ | ४३४३ दि.४/२/२०१३ | ९२०३०१ दि.४/२/२०१३ | १४९६७४० |
| १२ | ४३४३ दि.४/२/२०१३ | ९२०७७७ दि.४/२/२०१३ | ५०२८४८ |
| १३ | ४७२९ दि.७/३/२०१३ | ९२०७८० दि.७/३/२०१३ | ६३५६०८ |
| १४ | ४८२१ दि.१५/३/२०१३ | ८९६८९२ दि.१५/३/२०१३ | ११५८६२४ |
| एकुण | | | ८९६९४०० |

संबधित कंत्राटदारास २०१२–१३ अखेर पर्यंत रू.८९६९४००/– रक्कम अदा केल्याचे लेखापरीक्षण केले असता आढळले परंतु कंत्राटदारास देण्यात आलेल्या कामाचे आदेशामध्ये ६ महीने मुदत असून २००८ पासून २०१२–१३ पर्यंत टॅंकरने पाणीपुरवठा करणेबावत मुदतवाढ देण्यात आली असल्यास त्या बाबतचे आदेश लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात यावेत.

२) २०१२–२०१३ या आर्थिक वर्षामध्ये संबधित कंत्राटदारास देयकाचे प्रदान करण्यापूर्वी बॅंक हमीपत्राची मुदतवाढ देण्यात आली असल्यास त्याची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात यावी.

३) पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडील शासन निर्णय क्र.टंचाई–१००८/प्र.क्र.१४/पापु–१४ दि.११/०६/२००९ मधील अट क्र.२ नुसार पाणीपुरवठा करणाऱ्या टॅंकर व टॅंकरवरील वाहन क्षमतेबाबत प्रादेशीक परिवहन अधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. तसे प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही.

४) खाजगी टॅंकरने पाणीपुरवठा करण्यासाठी प्रथम कामास सुरवात करण्यापुर्वी वाहतूक ठेकेदारांनी वाहन क्षमतेचे प्रमाणपत्राची (वाहनाचे राज्य परिवहन विभागाने

Scan with Fast Scan

ध८

दिलेल्या नोंदणी पत्रातील क्षमता स्वाक्षांकित सहीसह व टँकरचे आरसी व टीसी पुस्तकाची प्रमाणित प्रतीची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

५) कंत्राटदारा बरोबर कामाबाबतचा करारनामा केलेला असल्यास त्याची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

६) टँकरने पाणीपुरवठा केलेल्या ठिकाणी संबंधीत स्थानिक प्रतिनिधींची सही घेण्यात आलेल्या बाबतचा पुरावा लेखापरीक्षणास उपलब्ध करून दिलेला नाही.

७) टँकरने पाणीपुरवठा केलेल्या नोंदी मोजमाप पुस्तकामध्ये घेण्यात आलेली असल्यास त्या मोजमाप पुस्तके लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि.क्र.२५

## पाणी पुरवठा विभाग

विषय:– टँकरने पाणीपुरवठा करणे या कामामधील अनियमिततेबाबत.

उल्हासनगर महानगरपालिकेकडील पाणीपुरवठा विभागाकडून महानगरपालिकेच्या हद्दी मधील नागरिकांना टँकरने पाणीपुरवठा करण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र.५५ दिनांक २८/०८/२००८ नुसार मंजुरी प्राप्त झाल्यानंतर निविदा मागवून मे शुभम कन्ट्रक्शन यांना कामाचे आदेश देण्यात आले होते तथापी पाण्याचा पुरवठा कमी दाबाने होत असल्यामुळे टँकरने पाणीपुरवठा बाबतची मागणीत वाढ झालेली असल्यामुळे संबंधित कंत्राटदाराना सन २०१२–१३ या आर्थिक वर्षामध्ये टँकरने पाणीपुरवठा करण्यात आलेला असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| कंत्राटदाराचे नाव व कामाचे आदेश क्र. | प्रमाणक क्रमांक | रक्कम |
|---|---|---|
| मे शुभम कन्ट्रक्शन | ४१०४ दि.८/०१/२०१३ | ४७८१३२ |
| | ४१९८ दि.२६/०२/२०१३ | ५२२३२० |
| कामाचे आ.क्र.१७४९ दि.१२/७/२०१० | ४८६२ दि.१८/०३/२०१३ | ५४९३१० |
| | ४३६ दि.०४/०५/२०१२ | ५३४५३६ |
| | ८५३ दि.२५/०५/२०१२ | २७९९७६ |
| | १६३६ दि.२७/०७/२०१२ | ६५०४८३ |
| | १८८४ दि.२१/०८/२०१२ | ३२२४२० |
| | २२२८ दि.१३/०९/२०१२ | ४१०९१३ |
| | २९१२ दि.२२/१०/२०१२ | ४५९०८१ |
| | | |

| | | |
|---|---|---|
| | ३०७० दि.०६/११/१२ | ६३१०७१ |
| | ३२१९ दि. २६/११/१२ | ५२८१४२ |
| एकुण रक्कम रूपये | | ५२६६३९४ |

सन २००८–२००९ ची निविदा असून त्यास वारंवार मुदतवाढी दिल्या आहेत. नव्याने निविदा मागवून काम देणे आवश्यक आहे. तसे न करता वरील ठेकेदारांना निविदा न मागविता यांना आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत, उल्हासनगर महानगरपालिकेस महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ यांचे कडून पाण्याचा पुरवठा करण्यात येत असून महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ यांचेकडून पाण्याचा स्त्रोत कमीप्रमाणात होत असल्याचे कारण नमुद करण्यात आलेले आहे. परंतु पाण्याचा स्त्रोत कमी प्रमाणात होत असल्याबाबतचे अभिलेखे नस्तीत उपलब्ध झालेले नाही.

२) खाजगी टॅंकरने पाणीपुरवठा येत असलेल्या वाहनांची वाहन क्षमतेच्या प्रमाणपत्राची प्रत व राज्य परीवहन विभागाने दिलेल्या नोंदणी पत्रातील क्षमता वाहनांची आरसी व टीसी पुस्तकाच्या प्रमाणीत प्रती मागणी करूनही लेखापरीक्षणास उपलब्ध झाल्या नाहीत.

३) ज्या सोसायटी व खाजगी मालकास पाण्याचा पुरवठा टॅंकरने करण्यात आलेला आहे त्याचे मागणीपत्र व मिळाल्याच्या दिनांकित स्वाक्षऱ्या बाबतचा पुरावा लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.

४) सदर कंत्राटदाराकडून बॅंक गॅरंटी घेण्यात आलेली नाही तरी देयकाचे प्रदान केलेले आहे.

Scan with Fast Scan

५) कंत्राटदारास देण्यात आलेल्या(कामासाठी) मुदतवाढ देण्यात आलेली असल्यास त्याची प्रत लेखापरीक्षणास उपलब्ध करण्यात आली नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि.क्र.२६

## पाणी पुरवठा विभाग

विषय:— पाणीपट्टी वसूलीचा दर कमी आकारलेला असल्यामुळे झालेल्या नुकसानी बाबत

उल्हासनगर महानगरपालिके कडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३(२०) नुसार महानगरपालिकेच्या हद्दीतील नागरीकांना पुरेसे व स्वच्छ पाणीपुरवठा करणे हे (ना नफा ना तोटा या धरतीवर) महानगरपालिकेचे कर्तव्य आहे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या पाणीपुरवठा व मलनि:सारण योजनांच्या संचलन व्यवस्थापन देखभाल व दुरूस्ती कार्यक्षम होण्याच्या दृष्टीने पाण्याचे व मलनि:सारणाचे दराबाबत नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण २००९/प्र.क्र.२०७/०९/नवि २० दि.२/८/२०१० मध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रमाणे आकारणी करणे आवश्यक आहे. त्यानुसार महानगरपालिकेने पाणीपुरवठा करण्याबाबतचे दर ठरविण्यात आलेले आहेत त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

महाराष्ट्र औदयोगिक विकास महामंडळ यांचेकडून उल्हासनगर महानगरपालिकेस पाणीपुरवठा करण्यात येत असून पाणीपुरवठया चा दर हा रू. ७००० प्रती घनलिटर या दराने घेण्यात येत आहे त्यावर शासन निर्णया मधील तरतुदी प्रमाणे त्यावर खालील प्रमाणे आकारणी करणे आवश्यक आहे

आस्थापनेवरील खर्च

पाणीपुरवठयाशी निगडीत विजेचा खर्च (उद्‌भवापासून ते वितरण व्यवस्थे पर्यंत)

पाणी पोहचण्यासाठी लागणाऱ्या विजवरील खर्च.

पाणी शुध्दीकरण करण्यासाठी लागणाऱ्या रसायनाचा खर्च

पाणीपुरवठा व्यवस्थापन अंतर्गत स्थापत्य व यांत्रिकी कामाकरीता लागणारा देखभाल व दुरूस्तीवरील खर्च

पाणीपुरवठा योजनेतील विविध अपांगाचा घसारा खर्च

पाणीपुरवठा योजने करीता घेण्यात आलेल्या कर्जाच्या व व्याजाच्या रकमेची परतफेडी ची रक्कम

पाणीपुरवठा करणे पूर्वी पाण्याचे नमुने तपासणीसाठी करण्यात आलेला खर्च इत्यादी खर्चाच्या रकमेचा समावेष करण्यात आलेला नसल्यामुळे महानगरपालिकेस नुकसान होत आहे.

२) शासन निर्णय दि.२/०८/२०१० मध्ये नमूद करण्यात आलेल्या कार्यपध्दती नुसार पाणीपट्टीचे दर ठरविताना नळ जोडणीच्या व्यासाशी निगडीत न ठेवता व्हाल्युमेट्रिक पध्दतीने प्रती किलो लिटर या स्वरूपात करण्यात यावे ज्या ठिकाणी रहिवाशी मालमत्तांना अदयाप जलमापके बसविण्यात आलेली नाहीत त्या ठिकाणी जलमापके बसवेपर्यंत सर्वसाधारणपणे ५ माणसे गृहीत धरून दरडोई दरदिवशी होणाऱ्या पाणीपुरवठयाच्या प्रमाणाशी गुणाकार करून ३० दिवसात पुरवठा होणाऱ्या पाण्याचे प्रमाण व त्याची व्हाल्युमेट्रिक पध्दतीने होणारी किमत विचारात घेउन दरमहा पाणीपट्टीची आकारणी न केल्यामुळे २०१२–१३ या वर्षामध्ये महानगरपालिकेस सन २०१४–२०१५ या वर्षामधील अर्थसंकल्प पुस्तकामधील सन १२–१३ मधील पाणीपुरवठया वरील खर्च व उत्पन्न याच्या खर्चाचे अवलोकन केले असता महानगरपालिकेस रू.२००२८६००००/– मात्र जादा खर्च हा महानगरपालिकेने केला आहे. यामुळे मनपाचे नुकसान झालेले

Scan with Fast Scan

असल्यामुळे शासन निर्णया प्रमाणे पाणीपुरवठा व मलनि:सारण बाबतच्या दराने आकारणी करणे आवश्यक आहे. त्याचे पालन झालेले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि. क्र.२७

## पाणी पुरवठा विभाग

विषय:— पाणीपुरवठा विभागाचे लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध झालेले नाहीत.

उल्हासनगर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडील खाली दर्शविण्यात आलेला अभिलेख लेखापरिक्षणास अनेकदा मौखिकपणे व वारंवार मागणी करूनही अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध झालेले नाहीत त्यामुळे लेखापरिक्षण करण्यास अनेक अडचणी निर्माण झालेल्या असून अभिलेखे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात यावेत.

१) जवाहरलाल नेहरू नागरी पुर्नवसन अभियान अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे कामासाठी अंदाजपत्रकात नमूद करण्यात आलेल्या एम.जि.पी.ची दरसूची

२) निविदा स्वीकृत झालेल्या वर्षाचे जुन्या दराप्रमाणे ताळमेळ घेण्यात आलेल्या वर्षाची एम.जी.पी.ची दरसूची

३) निविदेमधील clause 38 च्या प्रस्तावामध्ये वापरलेल्या दराबाबतची एम.जी.पी.ची दरसूची

४) पाणीपुरवठा प्रकल्पासाठी नेमण्यात आलेल्या सल्लागारास अदा करण्यात आलेल्या देयका संबंधित निविदेबाबतचा पत्रव्यवहार व मोजमापके व इतर बाबातचा पत्रव्यवहार

५) मे मेनार्च सर्वे अँड कंत्राट प्रा ली याना २०१२–१३ या आर्थिक वर्षामध्ये प्रमाणक क्र.४६०२ दि.२६/०२/२०१३ रूपये ९९९९००/–

Scan with Fast Scan

व ४७७९ दिनांक १३/०३/१३ रूपये ९६६५७०/– वरील कामाबाबतची निविदा मोजमापपुस्तके व त्याबाबतचा पत्रव्यवहार

६) मलनि:सारण प्रकल्पासाठी सन २०१२–१३ यावर्षामध्ये करण्यात आलेल्या खर्चाबाबतची प्रमाणके मोजमापपुस्तके निविदा डी.डी.आर मंजूर केलेल्या दरसूची व त्याबाबतचा पत्रव्यवहार वरील अभिलेख लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात आला नाही. यामुळे या कामाचे लेखापरिक्षण होऊ शकले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि. क्र.२८

## पाणी पुरवठा विभाग

विषय:— उल्हासनगर मनपा अंतर्गत असलेले विविध बुस्टर पंपिंग स्टेशन चालवणे व देखभाल दुरूस्ती कामातील अनियमितता

अंदाजपत्रक रक्कम रु. ९२०५९६८/— तांत्रिक मान्यता कार्यकारी अभियंता मान्यतेचा क्र.२ दि.५/२/११

प्रशासकीय मान्यता रु.९७७६७३९/— स्थायी समिती ठराव क्र. ६७ दि. १०/०८/२०११(६.२० टक्के जास्त दराने)

कार्यादेश क्र. १८७९ दि. १५/९/२०११ मुदत १२ महिने

ठेकेदार :— मे. हर्षल टेक्नीस नाशिक

कामाचा कालावधी — दि. १५/९/११ ते ३१/३/२०१३ प्रमाणक क्र. ४४०३ दि. १२/२/१३

कामावर झालेला खर्च रु. २८९१८५६/—

सदर कामाची निविदा नस्ती, बिले तपासली असता खालील उणीवा निदर्शनास आल्या.

१) निविदा मान्यते बाबत तांत्रिक कर्मचारी यांचे अर्हता पत्रतेचे व अनुभव दाखले इ. अभिलेख नस्तीत निर्दशनास आले नाही

२) ईएसआयची नोंदणी केल्याचे प्रमाणपत्र नस्तीमध्ये नाही.

३) निविदीमधिल अटीतील अनेक्शर १ नुसार कर्मचारी यांचे वय १८ ते४५ असणे आवश्यक आहे. परंतु कागदपत्रे जोडले नाही.

४) अंदाजपत्रकात बाजारभावाप्रमाणे दर विचारात घेतले आहेत. त्याचे अभिलेखे उपलब्ध नाही.

५) निविदेसोबत एफडीआर रू. २,९३,३०२/– ची खात्री करता आली नाही.

६) कामगार किमान वेतन कायदयानुसार दर निश्चित केले आहे. त्यामध्ये पीएफ ईएसआय व लेबर लायसन्स फी समाविष्ट असून ती ठेकेदाराने भरल्याचे कागदपत्रे नाही. तसेच किमान वेतन कायदयानुसार वेतन प्रदान केल्याचे प्रमाणपत्र अथवा बँक पासबुक उपलब्ध करून देण्यात आले नाही.

७) निविदा अटी व शर्ती नुसार कामगारांचे हजेरीपत्र ठेवले नाही

८) कामाच्या देखभाल दुरूस्तीसाठी निविदेमधिल तरतूदीनुसार कामाचा रोजच्या रोज अहवाल घेणे व वेळोवेळी तपासणी करणे बंधनकारक आहे त्याचे पालन झाले नाही.

९) मोजमाप पुस्तिका क्र.७८ नुसार दि. १/९/१२ ते दि. ३१/१/१३ ची देयके फक्त अस्थापन खर्च दाखवला आहे. परंतू देखभालीसाठी साहित्याकरीता रू. ७,१४,४३७/– खर्चाचे प्रदान केलेले आहे. त्याची हिस्ट्री शिट व DISMENTAL नोंदवही ठेवली नाही. त्यामुळे झालेला खर्च तपासता आला नाही.

१०) कार्यादिशानुसार कामाची मुदत दि.१४/९/१२ रोजी पूर्ण होत असून नस्तीत मुदतवाढ घेतली असे अभिप्राय नाही. निविदा अटी व शर्ती क्र.६ चे पालन झालेले नाही.

११) कामगारांचा विमा काढलेला नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

परि.क्र.२९

# पाणीपुरवठा विभाग

**विषय:-** चोपडा पंपींग स्टेशन येथील रोहित्राच्या दुरूस्तीच्या केलेल्या कामामधील अनियमितता.

१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या टप्पा क्र.१ अंतर्गत चोपडा पंपींग स्टेशन २२/०.४३३ केव्ही उपकेंद्रामध्ये कमी दाबाच्या २०० KVA रोहित्रामध्ये व विद्युत वाहिन्यांमध्ये झालेल्या बिघाडामुळे कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभागाकडील दि. २/७/२०१२ च्या पत्रांमध्ये मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम प्रकरण ५(२) (२) नुसार मा. आयुक्त यांनी दि. २९/०८/२०१२ रोजी मंजूरी देण्यात आली असून सदरचे काम मे. कल्पतरू इंजिनिअरींग यांना कामाचे आदेश पाणीपूरवठा विभागाकडील कामाचे आदेश क्र. UMC/WSD/EE/MECH/18 दिनांक ०५/०१/२०१३ नुसार रू. ३६१४१४/- एवढया रकमेचे देण्यात आले आहे. वरील काम तातडीचे असताना कामाचे आदेश व काम पूर्ण करण्यास लागलेला वेळ याचा विचार करता वरील कामासाठी वापरण्यात आलेला नियम मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम प्रकरण ५(२) चे उल्लंघन झाले आहे तरी याबाबत लेखापरिक्षणास खुलासा करण्यात यावा.

२) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता १९८४ मधील परिशिष्ट क्र. २४ मधील अ.क्र. ११ नुसार कामाची मापे तपशीलवार नोंदविणे आवश्यक आहे.

३) महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ मधील नियम क्र. १८० मधील ३व४ प्रमाणे मोजणी पुस्तकामध्ये नोंदविण्यात आलेली मापे यावर काट मारणे आवश्यक आहे. तसेच मोजमाप पुस्तकामध्ये प्रत्येक नोंदीवर प्रदानाचा शेरा मारणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे कार्यवाही केलेली नाही.

४) महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम लेखा संहिता १९८४ मधील परिशिष्ट क्र. २४ मधील नियम क्र. ११(२) नुसार कामाची तपासणी कार्यकारी अभियंता यांनी करणे आवश्यक आहे. व त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि क्र.३०

# नगर रचना विभाग

विषय:— उल्हासनगर शहराचा सुधारीत विकास आराखडा योजना या कामातील अनियमितता.

स्थायी समिती ठराव क्र. ११६ दि. ५/०२/२०१० नुसार उल्हासनगर शहराचा सुधारीत योजना आराखडा बनविण्याचे काम "CEPT" अहमदाबाद यांना दिलेले आहे. सदर कामाबाबतची नस्ती व प्रमाणके तपासली असता खालील उणीवा निदर्शनास आल्या.

१) कामाची वर्तमानपत्रात जाहिरात दिल्याचे अभिलेख नाहीत.

एकुण ३निविदाधारक यांनी निविदा सादर केल्या असून EOi च्या clause ५.४ अन्वये ७०टक्के पेक्षा जास्त गुण असणाऱ्या सल्लागार संस्थेस पात्र ठरतील परंतु त्यामध्ये फक्त एकच संस्थेस ७० टक्के पेक्षा जास्त गुण मिळालेले आहेत. त्यामुळे निविदेमध्ये स्पर्धा झालेली नाही. तसेच कामासाठी अनामत रक्कम व सुरक्षा अनामत रक्कम घेतली नाही.

२) निविदेपुर्वी बैठक दि. १८/१२/२००९ चे कागदपत्रे नाहीत.

३) मान्य निविदा व वाढीव फी असे एकुण रू. १०,६,२५,०००/— असून प्रत्येकी रू.१००/— च्या मुद्रांक पेपरवर करारनामा केला आहे. मुंबई मुद्रांक शुल्क अधिनियम—१९५८ मधील कलम ६३ नुसार रू.९८००/— वसुली करणे बाकी आहे.

Scan with Fast Scan

४) निविदाधारक "CEPT" अहमदाबाद यांनी वाटाघाटीनुसार दिलेले दर हे एकत्रीत असून त्यामध्ये कोणतेही जादा कराचा समावेश नाही. हया बाबी विचारात घेउन स्थायी समिती ठराव क्र.११६ दि. ५/२/१० निविदा मान्य केली आहे. तसेच करारनामा अट क्र. २.६.४. नुसार सर्व दर करासहित असल्याचे नमूद आहेत. असे असताना बिले प्रदान करताना १०.३०टक्के व १२.३६टक्के सेवाकर संबंधित यंत्रणेला अदा केला आहे. त्यामुळे सेवाकरापोटी रू. ११,०५,१२०/– जादा प्रदान झाले आहे.

५) उल्हासनगर शहराचा सुधारीत योजना आराखडा बनविण्याचे कामासाठी रू. ९१,०७,९२७/– झाला असून फक्त रू. ७८,९९४/– आयकर कपात केला आहे. आयकर अधिनियम १९६१ मधील कलम १९४[j] नुसार १०टक्के आयकर करणे कपात करणे बंधनकारक आहे. परंतु रू. ७८९९४/– वसूल केला आहे. उर्वरित रू. ८,३१,७९९/– व्याजासह वसूल करण्यात यावे.

६) कामाची मुदत २८ महिने असून ४/८/१२ रोजी पूर्ण झाली आहे पहिली मुदतवाढ संपणेपूर्वी दुसरी मुदतवाढ घेणे आवश्यक होते. परंतु दि. ४/६/२००३ रोजी मुदतवाढीसाठी अर्ज केला आहे. त्यास महासभेने दि. ५/२/१४ अन्वये मंजुरी दिली आहे. विलंब कालावधीसाठी दंडात्मक कार्यवाही करणे आवश्यक होते त्याचे पालन झाले नाही. तसेच वाढीव फी रू.४१,६५,०००/– मंजूर करण्याचे कारणे नमूद नाहीत. कामाच्या स्कोप प्रमाणे काम झाल्याचे प्रमाणित केलेले नाही. कामास विलंब झाल्याने

किमतीत वाढ झाली आहे. त्यामुळे सदर खर्चाचा बोजा मनपावर पडलेला आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

८३.

परि. क्र. ३१

# नगर रचना विभाग

विषयः— नगररचना विभागांतर्गत जीना, पॅसेज व लॉबी इ.बाबीं सवलतीकरीता आकारणी कमी जमीन दराने व ठरावाप्रमाणे न केलेबाबत

उल्हासनगर महानगरपालिका महासभा ठराव क्र.९१ दि. १०/३/१० अन्वये इमारत बांधकाम परवानगीच्या अनुषंगाने रहिवास व वाणिज्य प्रयोजनार्थ जीना, लॉबी, पॅसेज इ. बाबींच्या सवलतीकरीता शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमिनीचे ठरविलेले प्रचलीत बाजार दराच्या १५० टक्के(रहिवास प्रयोजनार्थ) व २५० टक्के (वाणिज्य प्रयोजनार्थ) अधिमुल्य शुल्क आकारणेचा ठराव मंजूर करण्यात आलेला आहे.

उल्हासनगर महानगरपालिका नगर रचना विभागाकडून २०१२–१३ मध्ये देण्यात आलेल्या इमारत बांधकाम परवानगीच्या काही प्रकरणांची तपासणी केली असता उपरोक्त ठराव तसेच शासनाच्या मुद्रांक विभागाने वेळोवेळी जमीनीच्या ठरविलेल्या प्रचलीत दराने अधिमुल्य शुल्काची आकारणी न केल्याने सोबत जोडलेल्या परीशिष्ठातील रकाना क्रमांक ११ मधील एकुण रूपये ११,८०,०६२/– इतकी रक्कम कमी आकारण्यात आल्याने सदर रक्कम वसुलपात्र आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

उमपा महासभा ठराव क्र.९१ दि.१०/०३/२०१० अन्वये आकारावयाचे जिन्याच्या अधिमुल्य शुल्क फरकाची वसुलपात्र रकमेचा तपशिल

| अ. क्र. | मालकाचे नाव | आर्किटेकचे नाव | बंधकामाचा पत्ता | बंधकाम परवानगी क्र. व दिनांक | जागेचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | जिन्याचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | महासभा ठ.क्र. ९१ दि. १०/०३/२०१० अन्वये आकारावयाचे अधिमुल्य शुल्क (जमीनीचा दर) | ठरावानुसार आकारणे आवश्यक एकुण रक्कम(रू) | आकारलेली रक्कम | कमी आकारलेली वसुलपात्र रक्कम(रू) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | श्री. कर सेवलानी | | प्लॉट क्र.३०,रू.क्र. २,सीटीएस क्र. ४५३६/४५३७/४५३८ उल्हासनगर २ | २२/२२/१८८ दि.१६/७/१२ | २७२.९ | ५४.४३ (रहिवासीकरीता) ३१.८२ (वाणिज्यकरीता) | ११७००X १.५ (रहिवासीकरीता) ११७००X२.५ (वाणिज्यकरीता) | ९५५२४७/– ९३०७३५/– | १२०९७०० | ६७६२८१ |
| २ | श्री. विजय देठे | | बॅरेक क्र. ३५७ सीटीएस क्र.२२६८३ उल्हासनगर ४ | २४/१२/१८२ दि. १२/७/२०१२ | २०९.०३ | ७०.४२ | ११७००X १.५ | १२३५८७१ | ९२४३०० | ३११५७१ |
| ३ | श्री. बाळु शिंदे | | बॅरेक क्र. १४५१ सीटीएस क्र.१८१५३ उल्हासनगर ४ | ६३/१२/७७० दि. २०/०२/२०१३ | ५८.५२ | ४.२२ | १४६५०X १.५ | ९२७३४ | निरंक | ९२७३४ |
| ४ | श्री. हरेश छाप्रिया | | बॅरेक क्र. ४५३ सीटीएस क्र.७२०३ उल्हासनगर २ | ६५/१२/४३२ दि. ०९/१०/२०१२ | ३५.९ | १०.६४ (रहिवासीकरीता) १०.६४ (वाणिज्यकरीता | ९३५०X १.५ (रहिवासीकरीता) ९३५०X२.५ (वाणिज्यकरीता) | १४९२२६/– २४८७१०/– | २९८४६० | ९९४७६ |
| | | | | | | | | | एकुण रक्कम | ११८००६२ |
| | | | | | | | | | | |



Scan with Fast Scan

परि. क्र. ३२

## वाहन विभाग

**विषय:- महापालिकेच्या मालकिच्या असलेल्या जड व हलक्या वाहनांच्या इंधनावरती झालेल्या खर्चाच्या अनियमिततेबाबत**

महापालिकेच्या वाहन विभागाचे २०१२-२०१३ या वर्षाचे लेखापरिक्षण करणेत आले २०१२-१३ मध्ये जड वहाने ३९ तसेच हलकी वाहने ११ अशी एकुण ५० वाहने कार्यरत होती. या वाहनाच्या इंधनासाठी महापालिकेने रक्कम रू. ४८,३०,६९६/- एवढा खर्च केलेला असून एकुण इंधनावरती झालेल्या खर्चाबाबत लेखापरीक्षणात खालील प्रमाणे त्रृटी निर्दशनास आल्या आहेत.

महापालिकेने नगरपालिका लेखा संहिता १९७१ नियम १५३ नुसार नमूना. न १२७ नुसार प्रत्येक वहानासाठी ठेवलेल्या स्कंद नोंदवहया (लॉग बुक )यांची तपसाणी करण्यात आली सदरच्या विहीत नमून्यानुसार स्कंद नोंदवहीमध्ये प्रत्येक दिवशी वाहन धावलेल्या किलोमीटर्सची संख्या नोंदविणेत आलेली नाही, प्रवास कोठून व कोठपर्यंत झाला याबाबतच्या नोंदी नोंदविणेत आलेल्या नाहित, एकुण वापरलेले इंधन तसेच खर्चाचे प्रमाणक क्रमांक व दिनांक अशा नोंदी घेणेत आलेल्या नाहीत प्रवासाचे प्रयोजन नोंदविण्यात आलेले नाही. वरील नियम १५३ नुसार स्कंद नोंदवहीत नोंदी घेण्याची कार्यवाही झाल्याचे निदर्शनास आले नाही.

वाहनांच्या स्कंद नोंदवहीमध्ये वाहनांची दरमहा एकुण झालेली सरासरी धाव तसेच वार्षीक सरासरी धाव यांचा गोषवारा काढणेत आलेला नाही वहानाचे मॉडेलवर्ष यांच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहित त्यामुळे वहानाची प्रतिलिटर इंधनामागे किती किलोमिटर धाव झाली याचा मेळ तपासणीत घेता आला नाही

Scan with Fast Scan

तसेच वर नमूद केलेला इंधनावरील खर्च रक्कम ४८,३०,६९६/– याचा योग्य वापर इंधनासाठीच झाला असे म्हणता येणार नाही. इंधनावरती झालेला खर्च योग्य न होता इंधनचोरी झाल्याचीही शक्यता नाकारता येणार नाही.

इंधन खर्चाचे देयके वाहन विभागामार्फत लेखा शाखेकडे पारीत होण्यासाठी सादर केली जातात. परंतु अशा देयकांची नोंद वाहन विभागातील नोंदवहीत घेउन सादर केली जात नसल्यामुळे लेखा शाखेकडे झालेला खर्च व प्रत्यक्ष वापरणेत आलेले इंधन याचा मेळ तपासणीत घेता आला नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका

परि. क्र 33

## वाहन विभाग

विषय :—महापालिकेच्या अधिका–यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडेतत्वावरील देण्यात आलेल्या वाहनावरील खर्चाच्या अनियमिततेबाबत.

महापालिकेच्या अधिका–यांना कार्यालयीन कामकाजासाठी भाडेतत्वावर वाहाने ठेक्याने पुरविणेकामी 2012–13 या वर्षात रक्कम रुपये 9123223/– एवढा खर्च केला असून यामध्ये खालील प्रमाणे अनियमितता झाल्याचे निदर्शनास येते.

अ) प्रस्तुत वाहने ठेक्याने पुरविणेकामी दिनांक 17/6/2010 च्या दैनिक सामना, द.फि.प्रेस जनरल, दै. प्रात काल, दै. नगर न्युज, या वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्दी देवून शिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदापैकी मे. अनमोल ट्रान्सपोर्ट यांची न्युनत्तम दरांची निविदा स्विकारणेत येवून स्थायी समिती ठराव क्र. 138 दि. 21/2/2011 अन्वये मंजूर दिली. परंतु स्थायी समितीने ठेकेदाराच्या विनंतीनुसार त्याच दरात सदर निविदेचा कालावधी 5 वर्षे असा केला . तथापि ठेकेदाराची एका वर्षाची भाडेतत्वावरील वाहने पुरविण्याची सेवा समाधान कारक असल्यास पुढील कालावधीचा विचार करणेत येईल व त्यानुसार अनमोल ट्रान्सपोर्ट याचा प्रस्ताव मंजूर केला. तसेच दरवर्षी प्रशासकीय मान्यता घेवूनच मुदतवाढ देण्याचे आयुक्तांनी आदेश दिलेले आहेत. 2012–13 या वर्षात या ठेक्याला मुदतवाढ दिलेली आहे. परंतु आयुक्तांच्या आदेशानुसार प्रशासकीय मान्यता घेणेत आल्याचे कागदपत्रांवरुन निदर्शनास आले नाही.

ब) प्रस्तुत भाडेतत्वावर वाहने पुरविण्याचा ठेका मे. अनमोल ट्रान्सपोर्ट यांना वेळोवेळी आवश्यक असलेली वाहने पुरविणेबाबत कार्यादेश देण्यात आलेले आहेत. त्यांचेकडून करारनामा करुन निविदा अटी शर्ती. क्र. 19 नुसार पुरवठा करण्यात येणारी वाहने ही नविन किंवा 2005 नंतरची (म्हणजे 2006 पासून) खरेदी केलेली

Scan with Fast Scan

असावीत व सर्व वाहनांचे आर.टी.ओ. नियमाप्रमाणे सर्व पेपरची पुर्तता कार्यादेश देतेवळी करण्यात असे नमूद आहे. परंतु ठेकेदाराला कार्यादेश देणेपुर्वी पुरवठा केलेली वाहने 2005 नंतरची असलेबाबत खात्री करुन कार्यादेश देणेत आलेली नाहीत. याबाबत खुलासा करुन अनुपालन दाखवावे.

क) निविदा अटी शर्त क्र. 20 नुसार निविदा स्विकारलेनंतर वाहन पुरवठादार ठेकेदाराने वाहानाचे आर.सी.बुक, टी.सी.बुक, इन्शुरन्स , टी परमीट इत्यादीच्या छायांकित व साक्षकिंत प्रती वाहन विभागाकडे सादर करणे बंधनकारक असतांना अशी कार्यवाही झाल्याचे दिसून आले नाही.

ड) वाहान विभाग कार्यालयात पुरवठादाराकडून प्रत्येक महिन्यात कार्यादेश देवून किती व कोणत्या प्रकारची वाहने ठेक्याने किती दिवसांसाठी मागविणेत आली व अशा वाहनांचा वापर कोणत्या अधिका–यांनी केला याबाबतचा संपूर्ण तपशिल स्वतंत्र नोंदवही ठेवून अशा नोंदी नोंदविण्यात आलेल्या नाहीत. त्यामूळे भाडयाने घेण्यात आलेली वाहने यांचा योग्यरित्या वापर झाला आहे. याची खात्री करता नाही.

इ) मा. आयुक्त यांचेकडील कार्यालयीन आदेश क्र./उमपा/आका/163 दिनांक 27/9/2011 नुसार भाडयाने घेणेत आलेल्या वाहनांच्या वापराबाबत अधिकारी यांच्यावरती निर्बंध घालणेत आलेले असून त्यानुसार प्रतिमहा 1250 कि.मी. पेक्षा जास्त व प्रतिदिवस 12 तासापेक्षा जास्त वाहान वापर टाळावा तसेच सार्वजनिक सुटया तसेच दुसरा व चौथा शनिवार आणि सर्व रविवार या दिवशी वाहन वापरण्याची आवश्यकता भासल्यास वाहन विभागास पुर्व सूचना देवून महापालिकेचे वाहन वापरणेत यावे तसेच

उप आयुक्त (वाहन) व वाहन विभाग प्रमुख यांनी ज्या वाहनाचा वापर जास्त किंवा अयोग्य होत आहे असे वाटल्यास सदर बाब आयुक्तांच्या निदर्शनास आणावी असे वरील आदेशात स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत. त्याचे पालन केलेले नाही. याबाबत भाडयाने घेण्यात आलेली वाहने व ठेकेदारास केलेले प्रदानाबाबत काही निवडक महिन्यातील प्रमाणकांचे लेखा परिक्षण करणेत आले व त्यानुसार खालील प्रमाणे 1250 कि.मी पेक्षा जास्त धाव झालेली वाहने त्यानुषंगाने ठेकेदारास जादा प्रदान झालेले आहे.

| अ. क्र. | प्रमाणक क्र. व दि. | वाहना चा प्रकार | प्रतिमहा मर्यादित धाव | प्रत्यक्षात झालेली धाव | जादा झालेली धाव | जादा प्रदान रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2183/ 11/9/12 बील क्र. 530 | इंडिका | 1250 कि.मी. | 1477 कि.मी. | 227 | 227X7=1589<br>32 X35=1120 |
| 2 | 2183/ 11/9/12 बील क्र. 528 | इंडिका | 1250 कि.मी. | 1546 कि.मी. | 296 | 296X7=2072<br>41X35=1435 |
| 3 | 5147/ 30/3/13 बील क्र. 828 | इंडिका ए.सी. | 1250 कि.मी. | 3180 कि.मी. | 1930 | 1930X7=13510<br>जादा तास<br>272X35=9520 |
| 4 | 5147/ 30/3/13 बील क्र. 830 | इंडिका ए.सी. | 1250 कि.मी. | 1872 कि.मी. | 622 | 622X7=4354<br>जादा तास<br>10X35=350 |
| | | | एकूण जादा प्रदान | | | 33950 |

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करुन अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखा परिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि. क्र. ३४

# वाहन विभाग

**विषय :– महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांच्या दुरूस्तीवर झालेल्या खर्चाच्या अनियमिततेबाबत.**

महापालिकेने त्यांच्या मालकिच्या वाहनांच्या दुरूस्तीवर २०१२–१३ या वर्षात रक्कम रू. ११,३५९०८/– इतका खर्च केला असून एकूण झालेल्या खर्च बाबत लेखा परिक्षणात खालीलप्रमाणे अभिप्राय देण्यात येत आहेत.

अ) महापालिकेच्या मालकिची २०१२–२०१३ मध्ये ३९ अवजड वाहने व ११ हलकी वाहने अशी एकूण ५० वाहने उपलब्ध होती प्रस्तुत वाहनांच्या दुरूस्तीवर झालेल्या खर्चाचे अभिलेखे यांची तपासणी करणेत आली. वाहनांच्या दुरूस्तीवरील खर्चाबाबत महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, य करिता निर्णय क्र. संकिर्ण/२००७/वाहन खरेदी /प्र.क्र.२७/२००८/नवि–२६ दिनांक १८/०२/२००८ अन्वये दिलेल्या आदेशाप्रमाणे काटकसरीचे धोरणाची उपाययोजना म्हणून तसेच उपलब्ध निधीचा जास्तीत जास्त सुयोग्य वापर होण्यासाठी महानगरपालिकांकडे असलेली वाहने सुव्यवस्थीत ठेवण्यासाठी आणि त्यांच्या दुरूस्तीसाठीच्या खर्चास मंजूरी देण्यासाठी काही विहीत पध्दती करण्यात आल्या आहे. त्यानुसार अतिरिक्त आयुक्त यांना पेट्रोल व डिझेल वर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्ष रू. २५,०००/– तसेच डिझेल वर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रतिवर्ष रू. ३०,०००/– (टायर, टयुब, बॅटरी इ. खर्चासह) खर्च करण्याच्या मंजूरीच्या शक्तीप्रदान केले आहे. यापैकी काही निवडक वाहनांच्या खर्चाच्या नस्ती खालीलप्रमाणे तपासल्या व यावर खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे.

| अ.क्र. | वाहन क्र. | वाहनाचा प्रकार | वर्ष | एकूण झालेला खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | एम.एच.०५ अे–९४६२ | जे.सी.बी. | २०१२–१३ | ६०,५५३/– |
| २ | एम.एच.०५ जी–६३४ | ॲम्बुलंन्स | २०१२–१३ | ७५,५९४/– |
| ३ | एम.एच.०५ एन–१६ | एसएलसीएम | २०१२–१३ | ४१,८१८/– |
| ४ | एम.एच.०५ पी–९०९० | होन्डासिटी | २०१२–१३ | १,२५,४३१/– |
| | | | | ३,०३,३९६/– |

वर नमूद केलेल्या वाहनांच्या दुरूस्ती खर्चाला मंजूरी देण्याचे पूर्ण अधिकार महापालिका आयुक्त यांना उक्त शासन निर्णयाद्वारे दिलेला असताना वरील

झालेल्या खर्चास उप–आयुक्त वाहन विभाग यांनी अधिकार नसताना मंजुरी दिल्यामुळे शासननिर्णयाचे उल्लंघन झाले आहे.

ड) सदरच्या शासननिर्णयामध्ये सर्व वाहनांच्या दुरूस्तीसाठी अधिकृत ठेकेदार असलेल्या गॅरेज मधून ३ दर पत्रके मागवून न्यूनतम दर असलेल्या गॅरेज वाल्याकडून वाहन दुरूस्ती करावयाचे असताना शासनाच्या सर्व वाहनांची दुरूस्ती स्थानिक अधिकृत नसलेल्या गॅरेज कडून वाहने दुरूस्तीवर खर्च केला आहे.

क) महापालिकेच्या सर्व वाहनांच्या दुरूस्तीसाठी केलेल्या खर्चाचे हिस्ट्री शिट (इतिहास नोंदवही) यांची तपासणी केली परंतू अशी नोंदवही विहित नमुन्यात ठेवण्यात आलेली नाही. प्रति माह वाहनांच्या दुरूस्तीचा गोषवारा तसेच वर्षात एकूण वाहनावरती आलेल्या खर्चाच्या बेरीज व सिरीज घेऊन मेळ घेण्यात आलेला नाही. त्यामुळे वर्षामध्ये प्रत्येक वाहनावरती दुरूस्तीसाठी झालेल्या खर्चाचे लेखा परिक्षण करण्यात आलेले नाही.

ड) वाहनांच्या हिस्ट्री शिट मध्ये वाहनाचा प्रकार, वाहनाचे मॉडेल वर्ष, इंजिन, चेसी नंबर, इंन्स्युरन्स बाबत माहिती, आर.टि.ओ. पासींग, आस.सी.बुकची झेरॉक्स इ. नोंदी ठेवण्यात आलेल्या नाहीत तसेच नोंदवही वर वाहन प्रमुख यांची तपासणी केल्याबाबत स्वाक्षरी घेण्यात आलेल्या नाहीत.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि.क्र.३५

# क्रिडा विभाग

उल्हासनगर महानगरपालिकेतील क्रिडा विभागाचे माहे मार्च २०१३ मधील खर्चाचे प्रमाणकांचे लेखा परिक्षण केले असता खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

अ) कामाचे नाव – उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात सन २०११ या वर्षासाठी श्री. गणेश दर्शन प्रतियोगीता आयोजित करणेबाबत.

पुरवठा दाराचे नाव– मे. महेश एन्टरप्रायझेस

प्रमाणक क्र.– २३४० दि. २०/०९/२०१२ व ५००५ दि. २५/०३/१३

खर्चाची रक्कम– रू. २१५०७५/– व रू. ७८९८०/–

स्थायी समिती ठराव क्र.१०६ दि.१२/१२/२०११

अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

१) महापौर कार्यालय, उल्हासनगर मनपा यांचे पत्र क्र. १०८९ दि. २२/०७/२०११ अन्वये उल्हासनगर मनपा क्षेत्रात क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती तर्फे श्री.गणेश दर्शन प्रतियोगीता आयोजित करण्यात आली आहे. परंतु सदर कार्यक्रमाचे स्वरूप कसे असावे याबाबत कोणतेही धोरण महापौर कार्यालयाकडून निश्चीत करण्यात आलेले नाहीत.

२) सदर कार्यक्रमाकरिता निविदा प्रक्रिया केली असता कार्यादेश क्र. १३९ दि. २९/०८/२०११ नुसार ५० उत्तेजनार्थ पारितोषिक प्रति नग रू. ३,०००/– प्रमाणे पूरवठा करण्याचे आदेश पुरवठादारास देण्यात आले. परंतू तद्नंतर पून्हा १०० अतिरिक्त उत्तेजनार्थ पारितोषिक पुरवठा करणेबाबत आदेश क्र. २१५ दि. १६/१२/११ अन्वये देण्यात आले. परंतू या १०० नग खरेदीबाबत निवीदा कार्यवाही न करता पुरवठा आदेश देण्यात आले आहेत.

३) प्रथम झालेल्या निवीदा प्रक्रियेत सार्वजनिक गणेश मंडळांना ५० उत्तेजनार्थ पारितोषीके वितरीत करण्याचे निश्चित करण्यात आले आहेत. परंतू या उत्तेजनार्थ परितोषीकांचे स्वरूप कसे असावे याबाबत पुरवठादारास कोणतेही निर्देश देण्यात आल्याचे नस्तीत आढळून आले नाही. एक उत्तेजनार्थ परितोषिकाची रक्कम रूपये ३००० प्रदान करण्यात आली असून एकूण ४,५०,०००/– इतकी रक्कम पुरवठादारास प्रदान करण्यात आल्याचे निर्दशनात आले आहे.

Scan with Fast Scan

४) मे. महेश एन्टरप्रायझेस यांचे बिल क्र. ५३ दि. २१/१२/११ मध्ये उल्हासनगर महापालिकेस वितरीत केलेल्या उत्तेजनार्थ पारितोषिकांचा तपशिल नमुद न करता तपशिलामध्ये उत्तेजनार्थ पारितोषिके असे नमुद करण्यात आले आहे. यामुळे खरेदी केलल्या मालाचा तपशील समजून येत नसल्याने खरेदी प्रक्रिया योग्यरित्या झाल्याची खात्री होत नाही.

५) दोन पुरवठा आदेशान्वये पुरवठादाराकडून एकूण १५० उत्तेजनार्थ पारितोषिके खरेदी करण्यात आली आहे. यापैकी फक्त ७४ उत्तेजनार्थ पारितोषिकांचे वितरण केल्याचे दिसून येते. उर्वरित ७६ उत्तेजनार्थ पारितोषिकांची अनावश्यक खरेदी करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबतची साठा नोंदवही लेखापरिक्षणास उपलब्ध नसल्याने प्राप्त पारितोषिकांची नोंद तसेच वाटप केलेल्या व शिल्लक पारितोषिके याबाबतची नोंद तपसता आली नाही.

६) निविदा अटी व शर्ती अट क्र १(क) नुसार कर नोंदणी प्रमाणपत्र पुरवठा दाराने सादर करणे आवश्यक असताना सदर प्रमाणपत्र तांत्रिक कागदपत्रात सादर करण्यात आलेले नाही.

७) प्रमाणक क्र. २३४० दि. २०/०९/२०१२ अन्वये रू.२१५०७५/- इतकी रूपये अदा करण्यात आली आहे. परंतू याबाबतचा तपशील, चलन इ. अभिलेखे लेखापरिक्षणाकरीता उपलब्ध झालेल्या नाहीत.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि. क्र. ३६

# क्रिडा विभाग

उल्हासनगर महानगरपालिकेतील क्रिडा विभागाचे माहे मार्च २०१३ मधील खर्चाचे प्रमाणकांचे लेखा परिक्षण केले असता खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

अ) कामाचे नाव – महापालिका अनुदानीत शाळेतील विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी क्रिडा साहित्य वाटप करणे.

पुरवठा दाराचे नाव– मे. जे.पी.कॉम्पूटर व एन्टरप्रायझेस

प्रमाणक क्र.– ४८७२ दि. १८/०३/२०१३

खर्चाची रक्कम– रू. २३४६००/–

अभिप्राय खालील प्रमाणे आहेत.

१) महापालिका अनुदानीत शाळेतील विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी क्रिडा साहित्य वाटप करणे करिता शिक्षण मंडळ, उमपा व क्रिडा, समाज कल्याण व सांस्कृतिक समिती, उल्हासनगर मनपा यांचे प्रस्ताव तसेच स्थायी समितीची मंजूरी लेखा परिक्षणास प्राप्त न झाल्याने खरेदीची आवश्यकता होती किंवा कसे याबाबतचे लेखापरिक्षणाची पडताळणी करता येत नाहीत.

२) भाला स्टॅडर्ड साईज (काठीसह) ६०० नगाची मागणी व त्याची अंदाजीत किंमत प्रती नग ४०० कोणत्या निकषावर निश्चीत करण्यात आली याबाबतचे अभिलेखे नस्तीत आढळून आले नाहीत. त्यामुळे ६०० नगांची मागणी, अंदाजीत किंमत, मालाचा दर्जा व बाजार भावानुसार योग्य असल्याबाबत लेखा परिक्षणाची खात्री होत नाही.

३) सन २००९–१० मध्ये शाळांना वाटप करण्यात आल्याचे नस्तीतील टिपणी वरील भांडार अधिकारी यांचे अभिप्रायावरून दिसून येते. परंतू त्याचा तपशील व साठा नोंदवही इत्यादी अभिलेख लेखापरिक्षणाकरीता उपलब्ध झालेले नाहीत.

४) निविदा करांच्या तांत्रिक कागदपत्रांच्या तुलनात्मक तक्त्यांवर उप–आयुक्त (मुख्या.) मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखा परिक्षक व आयुक्त यांची स्वाक्षरी नाही.

Scan with Fast Scan

५) निविदा अटी व शर्ती मधील अट क्र. १३ नुसार २००९–१० अखेर भरणा केलेले आयकर चलनाची साक्षांकित प्रत तांत्रिक कागदपत्रांसोबत सादर करणे आवश्यक असताना A-Y-2009-10 चे चलनाची छायांकित प्रत जोडण्यात आलेली आहे.

६) कंत्राटदाराच्या आयकर चलन, व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ या तिनही प्रमाणपत्रावरील कंत्राटदाराच्या पत्त्यात तफावत आहे.

७) कार्यादेश क्र. ४०३ दि. ३१/०३/२०११ नुसार कंत्राटदारास मालाचा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले. करारनाम्यातील अट क्र. ४ नुसार मालाचा पुरवठा करारनाम्यानुसार १० दिवसात करणे आवश्यक आहे. परंतू याबाबतची साठा नोंदवही लेखा परिक्षणाकरिता उपलब्ध न झाल्याने मालाचा पुरवठा विहित कालावधीत झाल्याची खात्री होत नाही.

८) कार्यादेशातील अट क्र. ४ नुसार साहित्य ताब्यात दिल्यानंतर शाळेतील मुख्यध्यापकांची स्वाक्षरी शिक्यासह घेण्याची जबाबदारी पुरवठादाराची आहे. तद्संबधी अभिलेख लेखापरिक्षणाकरीता उपलब्ध झाले नाहीत.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

## ...... विभाग

परि. क्र. ३७

**विषय:— शासन निर्णयानुसार क्रिडा विभागाकरिता तरतूद व प्रत्यक्ष खर्च न केल्याबाबत.**

शासन निर्णय नगर विकास विभाग क्रमांक जी.एन २०९८/प्र.क्र. २१/९८/नवी २४ दिनांक ०९/०३/१९९८ नुसार महानगरपालिकेने आपल्या वार्षिक खर्चापैकी ५ टक्के रक्कम क्रिडा क्षेत्राकरिता खर्च करणे आवश्यक आहे. उल्हासनगर महानगरपालिकेचे सन २०१२–१३ चे सुधारीत अंदाजपत्रक व प्रत्यक्ष खर्चाची रक्कम तपासली असता शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही झालेली नाही. (खालील प्रमाणे)

सन २०१२–१३ करिता आवश्यक तरतूद ५ टक्के रुपये १४,८८,०६,२५०/–

प्रत्यक्ष खर्च रु. २०,६०,०००/–(अर्थसंकल्पानुसार).

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

परि.क्र. ३८ सामान्य प्रशासन विभाग

विषय:– महानगरपालिकेतील मंजूर स्थायी व अस्थायी पदांची माहिती मिळणेबाबत.

उल्हासनगर महानगरपालिकेचे सन २०१२–१३ या वित्तीय वर्षाचे लेखा परिक्षण स्थानिक निधी लेखा संचालनालया मार्फत दिनांक २७/०२/२०१५ पासून सुरू करण्यात आलेले आले. लेखा परीक्षणाकरिता खालील माहिती तात्काळ उपलब्ध करून देण्यात आली नाही त्यामुळे लेखापरिक्षण करता आले नाही.

१) महानगरपालिकेतील एकुण मंजूर पदे व त्याची संख्या.

२) महानगरपालिकेतील एकुण मंजूर स्थायी व अस्थायी पदे व त्यांची संख्या

३) महानगरपालिकेत शासनाकडून प्रतिनियुक्तीवर आलेली पदे व त्यांची संख्या

४) महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता नियम–१२३ अन्वये पदावद्दलची नोंदवही(स्केल रजिस्टर) नमुना क्र.१२ मधील

५) कर्मचारी यांचे आयकर कपातीबाबत नमुना क्र.२४ मध्ये भरलेले आयकर विवरणपत्र.

६) महाराष्ट्र शासनाने ६वा वेतन आयोगानुसार मंजुर केलेली महानगरपालिकेतील पदांची वेतन श्रेणी

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि. क्र. ३९

# सामान्य प्रशासन विभाग

## निवडक कर्मचारी/अधिकारी यांचे सेवापुस्तकांचे लेखापरिक्षण

उल्हासनगर महानगरपालिकेतील कर्मचारी/अधिकारी यांचे सेवापुस्तकांचे लेखापरीक्षण केले असता खालीलप्रमाणे त्रुटी निदर्शनास आल्या आहेत.

१) श्रीमती शुभदा सुनिल पिंपळे, लिपीक/जकात निरीक्षक यांना खालीलप्रमाणे अर्जित रजा प्रवासभत्यासह प्रदान करण्यात आल्या आहेत.

दि. २२/११/२००४ ते दि. २५/११/२००४

दि. १८/१०/२००५ ते दि. २१/१०/२००५

दि. १३/०३/२००७ ते दि. १७/०३/२००७

रजा प्रवासभत्याबाबत महासभा/स्थायी समिती यांच्या ठरावाची प्रत लेखापरिक्षणास प्राप्त न झाल्याने रजा प्रवासभत्ता प्रदानाबाबत अटी व शर्ती इ.बाबत तपासणी करता आल्या नाही.

२) उमपा ठराव क्र.४० दि. २०/११/२००८ व आयुक्तांचे आदेश क्र. उमपा/साप्रवि/आस्था/मुली/२९४/०९/दि. ०३/०८/२००९ अन्वये श्रीम. पिंपळे यांची जकात निरिक्षक पदावर रू.४०००—१००—६००० या वेतनश्रेणीत पदोन्नती करण्यात आली. श्रीम. पिंपळे पदोन्नतीच्या पदावर दि. ०३/०८/२००९ रोजी प्रत्यक्ष हजर झाल्या आहेत. श्रीम. पिंपळे पदोन्नतीच्या पदावर दि. ०३/०८/२००९ रोजी प्रत्यक्ष हजर झाल्या असल्याने दि. ०३/०८/२००९ रोजी पदोन्नतीच्या पदाची वेतन निश्चिती करणे क्रमप्राप्त होते. अतिप्रदानाची वसुली होणे आवश्यक आहे. उमपा कार्यालयीन आदेश क्र. २१३ दि. ०७/१०/२०१० अन्वये श्रीम. पिंपळे यांनी स्थानिक स्वराज्य संस्था यांची एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण केल्याने दि. १६/०६/२००६ रोजी दोन आगाऊ वेतनवाढी, देण्यात आल्या आहेत

Scan with Fast Scan

परंतु याबाबत स्थायी समितीची मंजूरी ठराव लेखापरिक्षणास प्राप्त झालेला नाही.

३) दि. ०१/०७/२००८ रोजी वार्षिक वेतनवाढ निश्चित करतांना ३% वेतनवाढ रू.२५०.०५ असल्याने रू.२५०/— इतक्या रकमेची वेतनवाढ देणे आवश्यक असतांना रू. २६०/— इतकी वेतनवाढ दिल्याने अतिप्रदान झाले आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

विषय :- जागेचे बाजारमुल्य न करता भाड्याने देण्याच बाबत

# मालमत्ता विभाग

परि. क्र. ४०

१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकीची जागा स्थायी समिती ठराव क्र. ३४ दि. ०६/१२/१२ नुसार १० वर्षाच्या कराराने जाहिराती द्वारे निविदा मागवून देण्यात आले असून त्यामध्ये श्री. मिलींद भास्कर वैद्य यांना मालमत्ता विभागाकडील कामाचे आदेश क्र. २८८ दि. ३१/११/२००९ नुसार(पे.ॲन्ड पार्क) या तत्वावर देण्यात आलेला आहे. परंतू वरिल जागा हि भाडयाने देण्यापूर्वी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम क्र. ७९ (ड) प्रमाणे भाडयाने देण्याच्या जागेचे भाडे चालू बाजार भाव किंमती पेक्षा कमी असता कामा नये. अशी तरतूद असताना जागेचे बाजारमुल्य न करता जागा भाडयाने देण्यात आली आहे. याबाबत खुलासा करावा

२) श्री. मिलींद भास्कर वैद्य यांचा महापालिकेशी रू. १००/- इतक्या मुल्याच्या मुद्रांक पेपरवर करार करण्यात आलेला आहे. तरी वरील करार कशाच्या आधारे करण्यात आला याचा खुलासा करावा.

३) केंद्रशासनाची अधिसूचना क्र.३ दि. १७/०३/२०१२ नुसार कंत्राटदाराकडून सेवा कर वसूल केलेला नाही तो सेवाकर वसूल करून शासनास भरणा करण्यात यावा.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

विषय :- शिधा वाटप कार्यालयास भाड्याने देण्यात आलेल्या जागेबाबत

# मालमत्ता विभाग

हरि.क्र.४७

१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या ताब्यात असलेली वुडलँड मधील दुसऱ्या मजल्यावरील ५०७.० चौ.मी. ची जागा शिधावाटप कार्यालयासाठी मालमत्ता विभागाकडील पत्र क्र. उमपा/मालमत्ता/ ५५८/०४/दि. १३/०८/२००४ नुसार महासभेच्या अधिन राहून दि. १३/०८/२००४ पासुन करार न करता व महासभेचा/स्थायी समिती ठराव न करता व जागेचे भाडे न ठरविता देण्यात आलेला आहे. वरील जागेचे बाजार मुल्य उप अभियंता सार्वजनिक बांधकाम उपविभाग उल्हासनगर यांचे कडील जा.क्र.उअ/सा.बा.उ.वि/३/रेशा/१३५६ दिनांक ११/०८/२००८ नुसार जागेचे भाडे निश्चित केले असून दि. १३/०८/२००४ ते १२/०८/२००४ या कालावधीचे भाडे रू. ८५,५८,६०४/- एवढी रक्कम वसूल केलेली नाही. वसूल न करण्याच्या कारणासह अनुपालन देण्यात यावे.

२) शिधा वाटप कार्यालयास भाडयाने देण्यात आलेल्या जागेबाबतचा महापालिकेशी करार करण्यात आलेला नाही.

३) शिधा वाटप कार्यालयाकडून प्रलंबित असलेल्या भाडयाच्या रक्कमेवर केंद्रशासनाकडील अधिसूचना क्र. ३/२०१२ दि. ०७/०३/२०१२ नुसार सेवा कर वसूल करणे आवश्यक आहे याबाबत खुलासा दयावा.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

विषय :- शहिद अरूण कुमार वैद्य सभागृह (टाऊन हॉल) बाबत

परि क्र. ४२

# मालमत्ता विभाग

१) उल्हासनगर महानगरपालिकेच्या मालकिचे असलेले शहिद अरूण कुमार वैद्य सभागृह (टाऊन हॉल) हे महासभा ठराव क्र.९ दि. २०/०८/२००० व स्थायी समिती ठराव क्र. १४५ दि. २५/१०/२००० नुसार ३० वर्षाच्या करारावर रू. २३५२००००/- एवढया रक्कमेस श्री. कुमार चौनानी याला बीओटी तत्वावर मालमत्ता विभागाकडील कामाचे आदेश क्र. उमपा/मालमत्ता/९/दि. २०/०८/२००० नुसार देण्यात आले आहे. श्री. कुमार चौनानी याना टाऊन हॉल चे नूतनीकरण करण्यासाठी करारामधील अटी प्रमाणे मुदत २०/०८/२००३ पर्यंत देण्यात आली होती नूतनीकरन कालावधी संपल्यावर दिनांक २०/०८/२००३ ते १९/०८/२००४ पर्यंतच्या कालावधीचे भाडे करारामध्ये नमूद केल्याप्रमाणे रूपये ३०००००/- मात्र दराने वसूल करणे आवश्यक होते वरील रक्कम संबधित कंत्राटदाराकडून वसूल केले असल्यास त्याचा तपशील लेखापरिक्षण पथकास उपलब्ध करून देणात यावा.

२) कंत्राटदारा कडून बॅंक हमीपत्र रूपये १५०००००/- एवढया रक्कमेचे स्वराज अर्बन कोऑप बॅंक लि. यांचकडून बॅंकहमी पत्र क्रमांक १६/०८/२००३ रोजी घेण्यात आली आहे. बॅंक हमीपत्राची मुदत दि. १६/०९/२००३ रोजी संपलेली असून बॅंक हमीपत्राची मुदत वाढ केली असल्यास त्याची प्रत लेखा परिक्षणास उपलब्ध करून देण्यात यावी.

३) श्री. कुमार चौनानी यांनी निवेदेमधील अटी व शर्ती पूर्ण केल्यामुळे वरिल कामाचे आदेश देण्यात आलेले असून महानगरपालिकेची दि. १९/०८/२००२ रोजी करण्यात आलेल्या करारामध्ये अट क्र. ८(P) मध्ये जर कंत्राटदाराने कंत्राटामध्ये भागीदार घेण्याबाबत विनंती केल्यास परवानगी देण्यात येईल याबाबतच अट निवीदेमध्ये नसताना करारामध्ये नमुद केलेली आहे. त्यामुळे वरिल अट हि विधी विभागाकडून मंजूर करून घेण्यात आली असल्यास त्याची प्रत लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात यावी.

४) करारामधील अट क्र. ८(F) (ii) मध्ये नमूद केल्याप्रमाणे जर भाडे नविन वर्षाच्या पहिल्या दिवशी भाडे भरण्यास आले नसल्यास १८ टक्के प्रति वर्षी व्याजाची आकारणी करण्यात येईल याप्रमाणे सन २०१०-११ मधील रू. २,४९,९९९/- व २०११-१२ मधील भाडयापोटी रू. ३०००००/- असे एकूण ५४९९९९/- रकमेवरील व्याजासह वसूल करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे संबंधीताकडून रकमा

Scan with Fast Scan

वसूल करून महानगरपालिकेच्या निधीमध्ये भरणा केल्याबाबतचा पूरवा लेखापरिक्षणास उपलब्ध करून दयावा.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि. क्र. ४३

# मालमत्ता विभाग

**विषय:— समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून प्राप्त झालेल्या मालमत्ता ताब्यात घेणेबाबत.**

उल्हासनगर महानगरपालिकेस शासन निर्णय क्रमांक स/१०९४/सीआर–४/९४/रापी ९ दिनांक ७/०४/१९९४ अन्वये समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून मालकी हक्क असलेल्या प्लॉट च्या बांधकाम परवानगी देण्यात आलेल्या मालमत्ता पैकी २५टक्के मालमत्ता महानगरपालिकेच्या नावावर असून त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | जागा ताब्यात देणाऱ्याचे नाव | जागेचा पत्ता | जागेचे क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १ | श्रीमती गीता हेमनानी | राधा कॉम्प्लेक्स दसेरा मैदान उल्हासनगर–३ | २५७.१४ चौ.मी |
| २ | श्री मुकेश वाधवानी | प्लॉट क ६१९ (भाग)शीट क ६० व ७६ उल्हासनगर–३ | ३०० चौ.मी |
| ३ | श्री पुरूषोत्तम भागचंदानी | भूखंड क १७०(भाग)शीट क३२ ते ५२ उल्हासनगर–३ | ८३० चौ.मी |
| ४ | श्री चंदर अहुजा व श्री विनोद पंजाबी | यु नं ७६ (भाग) प्लॉट क १४/२४ शीट क ४९ उल्हासनगर–३ | १३३ चौ.मी |
| ५ | श्री जयराज कल्याणी | प्लॉट क.५८३ (भाग) ५८४(भाग)५९२(भाग)५९३(भाग) शिट क.५०५१उल्हासनगर–५ | ५४५.४७ चौ.मी |
| ६ | श्री जयराम ठाकूर | यु नं ७५(भाग)यु नं ७६(भाग)शीट क ४९ उल्हासनगर–३ | २५८.६४ चौ.मी |
| ७ | श्री मनोहरलाल नेभवाणी श्री संजय निचलानी | सबप्लॉट नं.३ते६ सर्वे नं.१७५ हिस्सा क.२७ सर्वे नं. १७६ हिस्सा क. १ शीट क ७५ उल्हासनगर– ३ | १४८४.२८चौ.मी |
| ८ | श्रीमती कमल माखीजा | यु नं ७६(भाग)प्लॉट क. १४/२४१शीट क ४९ उल्हासनगर–३ | १५४.९५ चौ.मी |
| ९ | श्री श्रीचंद कुकरेजा | प्लॉट क १४/२७ (भाग)१४/२८४ (भाग)शीट क ४९ उल्हासनगर– ५ | ८५.३७ चौ.मी |

Scan with Fast Scan

| | | | |
|---|---|---|---|
| १० | श्री सुनील राजवानी व इतर रिजन्सी | प्लॉट क १४/२५ ते १४/२८ शीट क ४९ उल्हासनगर–५ | ३१७.७२चौ.मी |
| ११ | श्री मन्नान के गोरे | यु नं १३२(भाग)प्लॉट क. २ | ३७३.००चौ.मी |

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan

परि. क्र. ४४

# लेखा विभाग

**विषय:— भविष्य निर्वाह निधीच्या लेख्यामधील अनियमितता.**

उल्हासनगर महानगरपालिकेच्या २०१२–१३ या वित्तीय वर्षाच्या लेखापरिक्षणाच्या वेळी कर्मचारी भविष्य निर्वाह निधीच्या लेख्याची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत.

१) महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम १९८३ मधील नियम क्र. १३(३) अन्वये भविष्य निर्वाह निधीतून एकदा अग्रीम दिल्यानंतर १२ महिन्य झाल्या शिवाय किंवा त्या अग्रीमाचा शेवटचा हप्ता यापैकी जो आधी असेल त्याची परत फेड करेपर्यंत विशेष कारण लेखी नोंदवून मंजूर करता येणार नाही. अशी तरतूद आहे. परंतू महानगरपालिकेने एकाच कर्मचाऱ्यास अधिक वेळा अग्रीम मंजूर केला आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक | अग्रीम मंजूर केल्याच्या वेळा |
|---|---|---|---|
| १ | श्री. भिमराव खैरे | ९७५ | ३ वेळा |
| २ | श्री. ओमी कंजानिया | १०३९ | ७ वेळा |
| ३ | श्री. मामीलाल ननुराम | ११८० | ३ वेळा |
| ४ | श्री. मुरली अहुजा | ११५८ | ६ वेळा |

२) शासन निर्णय क्र. ११८५/प्र.५२/तेरा अ दिनांक २८/०५/१९८६ मधील परिच्छेद क्र. ३ (२) अन्वये सेवा निवृत्ती पूर्वीच्या ३ महिन्याच्या वेतनातून भविष्य निर्वाह निधीची वर्गणी वसूल न करणे बंधन कारक आहे. तथापी महानगरपालिकेकडून कर्मचाऱ्याच्या सेवा निवृत्तीच्या महिन्यापर्यंत भविष्य निर्वाह निधीची वर्गणी वसूल केल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक | निवृत्तीचा महिना | वर्गणी वसुल केल्याचा महिना |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. रा.प.मुखी | ११६८ | फेब्रु. २०१३ | फेब्रु. २०१३ |
| २ | श्रीम. मनिषा अहुजा | १२०३ | ऑगस्ट २०१२ | ऑगस्ट २०१२ |
| ३ | श्री. एस.एल. चावल | १३०० | जुलै २०१२ | जुलै २०१२ |
| ४ | श्रीम. मीना करवे | १४५९ | नोव्हें.२०१२ | नोव्हें.२०१२ |

३) कर्मचाऱ्याची भविष्य निर्वाह निधी खातेवही(लेजर) पहाता जवळ जवळ २९८ कर्मचारी सेवानिवृत्त/मयत/सेवा सोडून गेल्याचे निर्दशनास आले आहे. परंतु

Scan with Fast Scan

अशा कर्मचाऱ्याच्या लेख्यामधील २०१२–२०१३ अखेर रू. १३९२०९/– इतकी रक्कम शिल्लक दर्शविलेली आहे. याबाबत महानगरपालिकेने योग्य ती कार्यवाही करून लेखे बंद करणे आवश्यक आहे.

४) कर्मचाऱ्याची भविष्य निर्वाह निधी खातेवही पहाता जवळ जवळ ३६ कर्मचारी सेवानिवृत्त/मयत झालेल्या कर्मचाऱ्याकडून ज्यादा प्रदानाची रक्कम रू. २४०१०/– वसुली प्रलंबित आहे. सदर रक्कम वसुल होणे आवश्यक आहे.

५) कर्मचाऱ्याची भविष्य निर्वाह निधीची रोखवही प्रमाणे शिल्लक रक्कम रू. २१०९५६२४१/– इतकी आहे. बृहत पत्रकाप्रमाणे शिल्लक रक्कम रू. १९९६१२९२५/– इतकी आहे. तफावत रक्कम रू. ११३४३३१६/– मात्र तफावती बाबत महानगरपालिकेने योग्य तो निर्णय घेणे आवश्यक आहे.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

परि.क्र.८५.

# वैद्यकिय आरोग्य विभाग

आमदार विकास निधीतून आरोग्य उपकरणे खरेदी मधील खालील अनियमितता.

१) वैद्यकिय उपकरणे खरेदी करणे करिता रू. १४,८१,७५०/— एवढया रकमेचे प्राकलन तयार केले असून त्यास जिल्हाधिकारी ठाणे यांचे प्रशासकीय मान्यता घेतलेली दिसून आली नाही.

२) वैद्यकिय उपकरणे खरेदी बाबत शासन दर करार असल्याचे नमूद केलेले आहे. त्याची प्रत नस्तीत समाविष्ट नसल्याने दराची खात्री करता नाही.

३) निविदा दि. ३१/१२/१२ रोजी मंजूर केली असून त्यामधील पुरवठादाराने आदेश न देता इतर पुरवठादाराना आदेश दिलेले आहेत. खुलासा करण्यात यावा.

४) ५% सुरक्षा अनामत रकमेचे अभिलेखे नस्तीत नाहीत.

५) मे. गुंजन सर्जिकल अँड & कंपनी यांना पुरवठा आदेश रू. ८,९३,२१३/— चे दिले आहेत. निविदेतील अटी नुसार ३० दिवसात उपकरणे पुरविणे बंधनकारक आहे. परंतु खालील साहित्य विलंबाने पुरवठा केला आहे. त्याची विलंब आकार प्रतिदिनी रू. १००/— प्रमाणे वसूल करण्यात यावे.

| साहित्याचा तपशील | डिलिवरी चलन क्र. व दि. | प्राप्त दि. | विलंब कालावधी | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|
| Tretment Table 1 नग | २०२८३ दि. निरंक | २/३/१३ | २४ दिवस | २४०० |
| Glucometer- 10 & Glucostrip-5 | २०२८३ दि. निरंक | २२/२/१३ | १४ दिवस | १४०० |
| Stethoscope 10 नग | | २१/२/१३ | १२ दिवस | १२०० |
| Ent Set-10 नग | २०२८९ दि. निरंक | १३/३/१३ | ३४ दिवस | ३४०० |
| Sonography machine- 1 & Ecg machine 1 नग | २०२७८ दि. निरंक | १५/२/१३ | ७ दिवस | ७०० |
| Loryngascope-10 नग & Ecg machine 1 नग | २०२७७ दि.—— | १४/२/१३ | ६ दिवस | ६०० |
| | | | एकूण ९७ दिवस | ९७०० |

परि.क्र.४६



# अनधिकृत व अतिक्रमण विभाग

विषय:— उल्हासनगर महानगरपालिकेचे अतिक्रमण विभागातील अभिलेख उपलब्ध करुन देण्याबाबत.

उल्हासनगर महानगरपालिकेचे अनधिकृत व अतिक्रमण निर्मुलन विभागातील अभिलेख लेखापरीक्षण करणेसाठी खालील अभिलेख उपलब्ध करुन देण्याबाबत. सन.२०१२—१३ अखेर एकूण किती अनधिकृत बाधकामे आहेत. त्याचे सर्वेक्षण कोणत्या अधिकारी / कर्मचारी यांनी केले त्यांचा दैनंदिनी अहवालासह कागदपत्रे देण्यात यावी.

प्रभाग क्र.१ ते ४ विभागाने एकुण किती बाधकामे निष्कासित करणेसाठी मंजुरी मागितली व विभागाने दिलेल्या मंजुरीचे आदेश व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचे अभिलेख उपलब्ध झाले नाहीत. प्रभाग क्र १ ते ४ मधील लेखापरीक्षण करताना बांधकामे निष्कसित करणेचे नोंदवही तपासली असता अपूर्ण असून बांधकाम पाडण्यासाठी आलेला खर्च (उदा. पोलीस संरक्षण, मशनरी मंजूर, इतर कर्मचारी) यांच्यासह रक्कमेची परिगणना केली नाही. महाराष्ट्र प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४३८ व ४३९ तसेच कलम ४७९ नुसार झालेला खर्च वसूल करण्याचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही केली नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक नुकसान झाले आहे. अनाधिकृत बांधकामे निष्कासित केलेल्या इमारतीचे निरूपयोगी साहित्याची जमा नोंद व लिलावादवाने केलेल्या विक्रीचे कगदपत्रे उपलब्ध करुन देण्यात यावे. अनाधिकृत बांधकामे निष्कासित करणेसाठी आयुक्त यांचे पत्र क्र. उमपा / अबनिवि / अतिक्रमण / १९६ / २००१ दि. ३० / १० / २००१ चे

आदेश आहेत. त्यामध्ये प्रति चौरस फुट रू. ६३/— दर असून ते सुधारीत केलेले नाहीत. सदर खुलासा करण्यात यावा. उल्हासनगर मनपा क्षेत्रात एकुण १४९ इमारती धोकादायक असल्याचे अभिलेख नस्तीत आहेत. त्याबाबत मनपाने पुढील काय कार्यवाही केलीचे कागदपत्रे नाहीत. पूर्तता करावी. रस्त्यावरील अनाधिकृत पथारीवाले हातगाडया विक्रते यांचे केलेली कार्यवाही त्यामधून प्राप्त झालेला महसुली निधी जमेबाबतची पावती पुस्तके व रोखवही देण्यात यावी. अनाधिकृत बांधकामे पथारीवाले निष्कासित करणेसाठी प्रभागाना अधिकार दिले आहेत. परंतु त्यावर अतिक्रमण विभागाचे नियंत्रण नसल्याचे दिसून आले.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावा.

मुख्य लेखा परिक्षक
उल्हासनगर महानगरपालिका

परि क्र. ५७

## विधी विभाग

विषय :- महानगरपालिकेतील वकील यांची पॅनलवर नेमणूक व वकील फी देयके प्रदानातील अनियमितता बाबत.

उल्हासनगर म.न.पालिकेचे विधी विभागाच्या सन २०१२-१३ या वित्तीय वर्षाचे अंतर्गत लेखा परिक्षण मार्फत खालील प्रमाणे अनियमितता आढळून आलेल्या आहेत. महानगरपालिकेच्या पॅनलवर वकील निवड करताना सदर प्रक्रिया अधिकाधिक पारदर्शक व उत्तम व्यावसायिक पात्रतेच्या व्यक्ती स्पर्धात्मक पद्धतीने निवड करावयास हवी तशी कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात आलेली नाही. उदा. सन २०१२-१३ मध्ये वकिल श्री. संजय वि. सयाने व श्री. अनिकेत उ. निकम यांची पॅनलवर वकिल म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर नेमणूक करण्याचा स्पर्धात्मक पध्दतीचा अवलंब केलेला दिसून येत नाही. तरी याबाबत खुलासा व्हावा.

वकिलांना प्रदान करण्यात येणाऱ्या फीच्या देयकांच्या संबंधीत केसरी रजिस्टरमध्ये नोंदी अद्यावत नाहीत. नोंदीवर सक्षम अधिकाऱ्याची स्वाक्षरी नाही. विधी विभागात वरपुढ नोंद वही व देयक नोंद वही ठेवलेली नाही.

वकिलांना महाराष्ट्र लॉ ऑफिसर्स नियमानुसार महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग शासन निर्णय दिनांक १६/९/१९९८ नुसार निश्चित दर ठरवून देण्यात आलेले आहेत त्यानुसार वकिलांना फी प्रदान होणे आवश्यक आहे. सन २०१२-१३ मध्ये १५४२९४३/- इतका वकिल फी चा खर्च झालेला आहे. तथापि महापालिकेने वकिल फी बाबत न्यायालयानुसार व केस नुसार निश्चित असे धोरण ठरविलेले दिसून आलेले नाही.

तरी याबाबत लेखी खुलासा करण्यात यावा व पुढील कार्यवाही प्रत्यक्ष करून अनुपालन सादर करावे.

मुख्य लेखापरिक्षक

उल्हासनगर महानगरपालिका

Scan with Fast Scan